एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, शनिवार २ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-४८, पाने-८, किंमत : ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 48, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 2 November, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

शुभ दीपावली
१०२ शतकोत्तर वाटचाल

दीपावली पाडवा भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा!

# बारामतीत पवार कुटुंबाचा दोन ठिकाणी पाडवा
# शरद पवार गोविंदबागेत! अजित पवार काटेवाडीत!




**बारामतीतील गोविंदबाग येथील पवार कुटुंबाचा दरवर्षी होणारा दिवाळी पाडव्याचा स्नेहमिलन कार्यक्रम आख्ख्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. या कार्यक्रमात शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे हे भेटायला आलेल्या नागरिकांच्या शुभेच्छा एकत्र स्वीकारायचे. मात्र, अनेक वर्षांपासूनची पवार कुटुंबाची ही कौटुंबिक प्रथा यावर्षीही राजकारणामुळे खंडीत होणार आहे. यंदा दिवाळी पाडव्याच्या कार्यक्रमाला अजित पवार गोविंदबागेत उपस्थित राहणार नसून ते पाडवा काटेवाडीत साजरा करणार आहेत. त्यामुळे पवार कुटुंबाचा पाडवा दोन ठिकाणी यावर्षी साजरा होणार आहे.**

■ पुणे

**अजित** पवार हे सुप्रिया सुळे यांना भाऊबीजेसाठीही भेटणार नाहीत. राजकीय महत्त्वाकांक्षेमुळे कौटुंबिक एकजुटीचा जाहीर अभिमान बाळगणाऱ्या या कुटुंबातही कायमची फूट पडली आहे.

पवार कुटुंब आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेल्या वर्षी फूट पडली. या फुटीनंतरची ही दुसरी दिवाळी आहे. दरवर्षी दिवाळी पाडव्याचा सण पवार कुटुंब बारामतीकरांबरोबर एकत्र साजरा करते. या दिवशी बारामतीतील शरद पवार यांचे निवासस्थान असलेल्या गोविंदबागेत पवार कुटुंबाला दिवाळी शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्ते, पक्षाचे पदाधिकारी हितचिंतक आणि सर्वसामान्य बारामतीकर यांची गर्दी होते. सत्ता असो वा नसो, शरद पवार आणि कुटुंबियांना दिवाळीच्या शुभेच्छा देणे, त्यांची भेट घेणे, त्यांचा आशीर्वाद घेणे ही अनेक वर्षांची परंपरा आहे. त्यासाठी सर्व पवार कुटुंब एकत्र येते. यंदा मात्र गोविंदबागेत वेगळे चित्र दिसणार आहे. या कौटुंबिक स्नेहसोहळ्यात अजित पवार अधिकृतरित्या दिसणार नाहीत. एवढेच नव्हे तर ते काटेवाडीतील आपल्या निवासस्थानी स्वतंत्र पाडवा साजरा करून लोकांच्या भेटीगाठी घेणार आहेत. सध्या बारामतीच्या दौऱ्यावर असणारे अजित पवार यांनीच आज हे जाहीरपणे सांगितले आहे. ते म्हणाले की, दिवाळीच्या दोन-तीन सुट्ट्या आहेत. उद्या मी काटेवाडीत लोकांना भेटणार आहे. काही बाहेरचे लोक आणि पक्षातील सुनील तटकरे, धनंजय मुंडे आदि भेटणार आहेत. सहयोगला एवढ्या » पान ७ वर

### गेल्या वर्षी डेंग्यू, यावर्षी फूट

गेल्या वर्षीही अजित पवार गोविंद बागेतील पाडव्याच्या कार्यक्रमाला अनुपस्थित होते. त्यावेळी सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्यांनी सावरण्याचा प्रयत्न करीत उत्तर दिले होते की, अजितदादांना डेंग्यू झाला असल्याने डॉक्टरांनी त्यांना २१ दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. मात्र नंतर उघड झाले की, त्याच्या आदल्याच दिवशी अजित पवार यांनी शरद पवार यांची गुपचूप भेट घेतली होती. तेव्हाच फुटीच्या चर्चेला आणखी जोर आला होता. यावर्षी मात्र कोणतीही लपवाछपवी न करता फूट पडल्याचे दोघा पवार नेत्यांकडून उघड झाले आहे.

## थोडक्यात...

### तुतारीचे ट्रम्पेट भाषांतर नको शरद पवार गटाला दिलासा

**मुंबई** - लोकसभा निवडणुकीत तुतारी आणि ट्रम्पेट यांच्यात साम्य असल्याचे दाखवून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात आला होता. त्याचा तुतारी चिन्ह असलेल्या शरद पवार गटाला मोठा फटका बसला होता. कारण तुतारीची काही मते ट्रम्पेटला गेली होती. या प्रकरणी शरद पवार गटाने निवडणूक आयोगाकडे तक्रार करून ट्रम्पेटचे भाषांतर तुतारी असे करण्यास मनाई करावी अशी मागणी केली होती. निवडणूक आयोगाने त्यांची मागणी मान्य करीत यापुढे ट्रम्पेटचे भाषांतर तुतारी असे करण्यास मनाई केली आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि निवडणूक अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या आहेत.

### दिवाळीत व्यावसायिक सिलिंडर ६२ रुपयांनी महाग

**मुंबई** - ऐन दिवाळीच्या काळात तेल कंपन्यांनी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. आजपासून १९ किलोचे व्यावसायिक गॅस सिलिंडर दर ६२ रुपयांनी महागला आहे. यामुळे हॉटेलमधील खाद्यपदार्थांच्या किमतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात वाढ झाली तरी तेल कंपन्यांनी १४ किलोंच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ केलेली नाही. मात्र, आगामी काळात विमानप्रवासदेखील महागण्याची शक्यता आहे. कारण तेल कंपन्यांनी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरासोबतच विमान इंधनाच्या किमतीमध्येदेखील वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत मुंबईत १७५५, दिल्ली १८०२, कोलकाता १९११, चेन्नई १९६५ रुपये आहे. व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीमध्ये गेल्या चार महिन्यांत १५० रुपयांहून अधिक वाढ झाली आहे.

### रविवारी नवाकाळ प्रकाशित होणार नाही

दिवाळी पाडवा सणानिमित्त शनिवार २ नोव्हेंबर २०२४ रोजी दैनिक नवाकाळ कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार ३ नोव्हेंबर रोजीचा दैनिक नवाकाळ अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**मॅनेजर**
**दै. नवाकाळ**

### तिरुमलातील सर्व सेवक हिंदूच हवेत! मंदिर अध्यक्षांचे आदेश

**तिरुमला** - आंध्र प्रदेशातील तिरुमला तिरुपती देवस्थानातील सर्व सेवक हिंदूच असावेत याला आपले प्राधान्य असेल असे मत देवस्थान व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष बी.आर. नायडू यांनी व्यक्त केले आहे. आपला पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे ही संधी दिल्याबद्दल आभार मानले आहेत. ते म्हणाले की, तिरुमला देवस्थानातील सर्व सेवक हिंदू असावेत याबाबत मी सरकारशी चर्चा करणार आहे. सध्या या देवस्थानातील इतर धर्माच्या सेवकांना इतर सरकारी विभागात सामावून घ्यावे किंवा त्यांना स्वेच्छानिवृत्ती द्यावी अशी विनंतीही करणार आहे. तिरुमला देवस्थानाच्या परिसरात किंवा सेवेतील सर्वांना दैवताविषयी आस्था असावी. इतर धर्मियांच्या सेवेमुळे इथे अनेक प्रश्न निर्माण होत असतात.

# भाजपाचे 'बटेंगे तो कटेंगे' समाजवादीचे 'जुडेंगे तो जीतेंगे'




**उत्तर प्रदेशातील ९ विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राज्यात प्रचाराला जोर आला आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पिछेहाटीमुळे भाजपाने आक्रमक प्रचाराचे धोरण आखले आहे. भारतीय जनता पार्टीचे योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' असा इशारा देत या वाक्याची होर्डिंग सगळीकडे लावली आहेत. त्याला समाजवादी पक्षाने आता 'जुडेंगे तो जीतेंगे' असे उत्तर देत बॅनरबाजी केली आहे. याआधी समाजवादी पार्टीने '२७ के सत्ताधीश' असे बॅनर लावले होते.**

■ लखनौ

**भारतीय** जनता पार्टी तर्फे हिंदू मतांचे ध्रुवीकरण करण्यात येत आहे. अयोध्येतील दिवाळीच्या कार्यक्रमातील योगी आदित्यनाथांचे भाषणही प्रचाराप्रमाणेच होते. भाजपा हिंदूंचा तारणहार म्हणून प्रस्थापित केला जात आहे. भाजपाच्या या धार्मिक प्रचाराला समाजवादी पार्टीने उत्तर देत राजधानी लखनौ येथील राजभवन ते समाजवादी पक्षाच्या कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर तसेच देवरियामध्ये 'जुडेंगे तो जीतेंगे' असे होर्डिंग लावले आहेत. समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते व पक्षाचे सचिव विजय प्रताप यादव यांच्या कल्पनेतून व पुढाकाराने हे होर्डिंग लावण्यात आले आहेत. या होर्डिंगवर फक्त » पान ७ वर

# ज्याचा १ आमदार नाही, तो मुख्यमंत्री कोण होणार सांगतो! सरवणकरांचा टोला

■ मुंबई

**शिवसेना** शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर माहीम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. मनसेकडून अमित ठाकरे रिंगणात असल्यामुळे सरवणकरांनी माघार घ्यावी, असे मत भाजपा नेत्यांनी व्यक्त केले. परंतु सरवणकरांनी आज ही शक्यता धुडकावून लावली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना टोला लगावत म्हणाले की, ज्याचा एकही आमदार नाही, त्याने मुख्यमंत्री कोण होणार हे सांगणे हे किती हास्यास्पद आहे. तर



कौटुंबिक स्नेहसंबंधांमुळे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार माघार घेईल, अशी शक्यताही त्यांनी बोलून दाखवली.

सदा सरवणकर म्हणाले की, माहीममधून माघार घेण्याचा प्रश्नच येत नाही. मला एबी फॉर्म दिला आहे. मी महायुतीचा उमेदवार म्हणून लढणार आहे. आणखी कोणी फॉर्म मागे घेत असेल तर चौकशी करा. मी प्रचार सुरू केला आहे, बैठकीला सुरुवात होणार आहे, दिवाळी असल्यामुळे कोणाच्या दारात जाणे किंवा आपल्या कार्यकर्त्यांना या कामात गुंतवणे हे बरे नाही. त्यामुळे दिवाळीचा एक दिवस आम्ही प्रचार केला नाही. माझी कुणाशीही विधान परिषदेबाबत चर्चा झाली नाही. मी काल वर्षा » पान ७ वर

# भाजपाची १६४ जागांची खेळी?

■ मुंबई

**भाजपाने** शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्याबरोबर झालेल्या वाटाघाटीत स्वतःला १४८ जागा घेतल्याचे दाखविले. मात्र प्रत्यक्षात त्यांच्याकडे १६४ जागा आहेत. कारण १६ ठिकाणी त्यांनी आपलेच उमेदवार उभे केले. फक्त त्यांना शिंदे आणि अजित पवार गटात प्रवेश करवून त्यांच्यामार्फत त्यांना निवडणुकीत उतरवले आहे.

संजना जाधव, नीलेश राणे, राजेंद्र गावित, संतोष शेट्टी, अजित पिंगळे, मुरली पटेल, शायना एनसी, अमोल खताळ, प्रताप चिखलीकर, निशिकांत पाटील, संजयकाका पाटील असे भाजपाचे १६ जण मित्रपक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवित आहे. मित्रपक्षांना त्या जागा दिल्यासारखे केले आणि स्वतःची ताकद वाढवली.

# सोलापुरात नरेंद्र मोदी यांची १२ नोव्हेंबरला जाहीर सभा



■ सोलापूर

**विधानसभा** निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापूर शहराच्या होम मैदानावर १२ नोव्हेंबरला जाहीर सभा होणार आहे. ते सोलापुरातील महायुतीच्या ११ उमेदवारांचा प्रचार करणार आहेत. याआधी ८ नोव्हेंबरला नाशिक आणि धुळ्यात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मोदी यांची सभा होणार आहे. मोदींच्या सभांना रेकॉर्ड ब्रेक गर्दी होईल. नाशिक, धुळ्यालाही मोदींच्या सभा होणार आहेत. त्यासोबत अहमदनगरसह ५ जिल्ह्यांत मोदी यांच्या सभांचे नियोजन असणार असल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी पंतप्रधान मोदी १२ जानेवारी आणि १५ मार्च असे दोन वेळा नाशिक दौऱ्यावर आले होते. आता विधानसभा निवडणुकीनिमित्त वर्षभरात तिसऱ्यांदा त्यांचा नाशिक दौरा असणार आहे.

### ९ नोव्हेंबरला शहा मुंबईत

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ९ नोव्हेंबरला केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे माजी अध्यक्ष अमित शहा मुंबईत येणार असून, या निवडणुकीसाठी ते पहिली जाहीर सभा घेणार आहेत.

# क्लस्टर पुनर्विकास योजनेच्या निषेधार्थ गावठाण कोळीवाड्यांमध्ये काळे कंदील

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य गृहनिर्माण धोरण २०२४ मधील गावठाण कोळीवाड्यांचा पुनर्विकास क्लस्टर योजनेच्या माध्यमातून करण्याच्या निर्णयाचा निषेध म्हणून यंदा राज्यातील सर्व गावठाण कोळीवाड्यांमध्ये काळे कंदील लावण्याचे आवाहन गावठाण, कोळीवाडे, पाडे संवर्धन समितीच्या वतीने करण्यात आले होते.

कालचा दिवस गृहनिर्माण धोरण २०२४ बाबतीत हरकती, सूचना स्विकारण्याचा शासनाने घोषित केलेला अंतिम दिवस होता. त्याचे औचित्य साधून संध्याकाळी समितीच्या वतीने ठाणे येथील चेंदणी कोळीवाडा या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या कोळीवाड्याच्या प्रवेशद्वारावर काळे कंदील लावून प्रतिकात्मक निषेध नोंदविण्यात आला. राज्यातील सात सागरी जिल्ह्यांतील सर्वच गावठाण, कोळीवाड्यांत वेशीवर, प्रमुख चौकात काळे कंदील लावण्यात आले. भविष्यात फार मोठी लढाई सर्व गावठाण कोळीवाडे यांना एकत्र येऊन संघटितपणे लढावी लागणार असून क्लस्टर योजनेच्या विरोधात संघटीत व्हा व घराघरात व्यापक जनजागृती करा, प्रत्येक कोळीवाड्यात, गावठाणात काळे कंदील लावून आपापल्या गावठाण, कोळीवाड्यांच्या वतीने निषेध नोंदवावा, असे आवाहन समितीने केले.

# प्रतिज्ञापत्रातील वयामध्ये गोंधळ सोरेन यांची उमेदवारी बाद?



■ रांची

**महाराष्ट्राबरोबरच** झारखंड विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीत मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी उमेदवारीचे निवडणूक आयोगाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्या वयाच्या माहितीत गोंधळ केला आहे. या मुद्यावरून भाजपाने हेमंत सोरेन यांच्यावर हल्ला चढवला असून, सोरेन यांचे वय ५ वर्षांत ७ वर्षे कसे वाढले असा प्रश्न उपस्थित केला आहे. या चुकीमुळे त्यांचा अर्ज बाद होऊ शकतो. मात्र भाजपा पराभवाच्या भीतीने नको ते मुद्दे पुढे करत आहेत, असे झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेत्यांनी म्हटले आहे. झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख नेते व मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आपला » पान ७ वर

# सिंचन घोटाळ्यावरून अजितदादांच्या गौप्यस्फोटामुळे देवेंद्र फडणवीस फसले

■ मुंबई

**सिंचन** घोटाळ्यासंबंधी दिवंगत आर. आर. पाटील यांच्याबाबत अजित पवार यांनी केलेल्या गौप्यस्फोटावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बाजी उलटवण्याचा प्रयत्न केला. अजित पवारांनी तो गौप्यस्फोट निवडणुकीच्या तोंडावर आम्हाला अडचणीत आणण्यासाठी केला खरा. पण त्यात फडणवीसांचे ब्लॅकमेलिंगचे राजकारण उघड



### जयंत पाटलांचा दावा

झाले, असा दावा पाटील यांनी केला.

सांगली जिल्ह्यातील तासगाव विधानसभा मतदारसंघात दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील शरद पवार गटातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांचा सामना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संजयकाका पाटील यांच्याशी होणार आहे. २९ ऑक्टोबर रोजी अजित पवार यांची तासगावात संजयकाका पाटील यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. याप्रसंगी अजित पवार यांनी सिंचन घोटाळ्याशी संबंधित किस्सा सांगितला. ते म्हणाले की सिंचन घोटाळ्यात मला अडकवण्याच्या प्रयत्नांत आर. आर. पाटील यांचाही सहभाग होता. त्यांनी या कथित घोटाळ्याची » पान ७ वर

# 'राज'पुत्र मतदारांच्या दारी अमित ठाकरेंचा प्रचार सुरू



■ मुंबई

**मुंबईतील** माहीम विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे मनसेकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. अमित ठाकरे यांना शिंदे गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर आणि ठाकरे गटाचे महेश सावंत यांचे आव्हान आहे. त्यांनी माहीम विधानसभा मतदारसंघात प्रचाराला सुरुवात केली आहे.

अमित ठाकरे सध्या पत्नी मिताली ठाकरेसह माहीम मतदारसंघात घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत. आज त्यांनी मतदारांशी संवाद साधला. अमित ठाकरेंनी आपण कोणत्या मुद्यांवर ही निवडणूक लढवत आहोत, त्यांच्याकडे मत मागण्यासाठी का आलो आहोत, याबद्दल मतदारांना सांगितले.

अमित ठाकरे यांनी प्रचारादरम्यान पत्रकारांना सांगितले की, माहीम मतदारसंघात माझा प्रचार सुरू केला आहे. कुणी समोर असो किंवा नसो मी माझा असाच प्रचार करणार आहे. ही निवडणूक माझ्यासाठी काही अवघड नाही. यापुढचे १५ ते २० दिवस मी लोकांच्या घरी जाऊन भेटी घेईन. रॅलींवर माझा विश्वास नाही. माझे व्हिजन काय हे मतदारांना पटवून देईन. मी माझे व्हिजन या लोकांसमोर मांडत आहे. मी आता एका घरात गेलो, तेव्हा मला त्यांनी सांगितले की, असा प्रचार कधीही झालेला नाही. आमच्याकडे » पान ७ वर

# प्रकाश आंबेडकर यांच्यावर अँजिओप्लास्टी यशस्वी

■ पुणे

**पुण्यातील** खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेले वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्यावर आज अँजिओप्लास्टी करण्यात आली. सध्या त्यांची तब्येत ठीक असून, प्रकाश आंबेडकर यांच्यासाठी प्रार्थना करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आंबेडकर कुटुंबीयांनी आभार मानले. प्रकाश आंबेडकर पुढील २४ तास आयसीयूमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली उपचार घेणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत त्यांच्या छातीत दुखू लागल्यामुळे काल त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यांच्यावर अँजिओग्राफीत एक छोटा ब्लॉक आढळला होता.

# छटपूजेआधी यमुना स्वच्छ होणार मुख्यमंत्री आतिशी यांची माहिती

■ नवी दिल्ली



**दिवाळीनंतर** होणाऱ्या यमुना छटपूजेची तयारी अंतिम टप्प्यात असून, पूजेआधी यमुना नदी स्वच्छ केली जाईल, अशी ग्वाही दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी दिली आहे. यमुनेला प्रदुषणामुळे फेस आला आहे. हा फेस हटवण्यासाठी रासायनिक फवारणी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी यमुनेच्या किनाऱ्यावर अनेक चौक्या तयार करण्यात आल्या असून, यांत्रिक बोटी व पाणबुड्यांच्या सहाय्याने हे काम करण्यात येत आहे.

दिवाळीनंतर यमुनेच्या तिरावर छटपूजा केली जाते. त्या दिवशी उपवास करून यमुनेत स्नान केले जाते. भगवान श्रीकृष्णाची षोड्षोपचार पूजा केली जाते. यमुना अष्टकाचे पठण करून यमुनेची आरती करून उपवास सोडला जातो. मात्र यमुनेत सोडण्यात आलेले सांडपाणी व औद्योगिक रसायनांमुळे यमुना नदीत मोठ्या प्रमाणावर फेस आला आहे. यमुनेच्या पाण्यातील प्रदूषण वाढले असून, छट पूजेच्या आधी यमुना स्वच्छ करणार असल्याचे दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी सांगितले आहे. यंदाची छटपूजा ६ किंवा ७ नोव्हेंबरला होणार आहे. त्या आधीच यमुनेतील सर्व फेस हटवणार आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

सिक्युरिटी गार्ड, सुपरवायझर, हाऊसकिपिंग, जेन्टस, लेडीज, पेंट्रीबॉय, इलेक्ट्रिशन प्लंबर, MST वरळी, खार, भायखळा, गोवंडी, माटुंगा **8291056761 / 7506129517** {NC242926}

मशीदबंदर / मरीनलाईन ऑफिसकरता त्वरीत हाऊसकिपर पाहिजे. 14000/- **9819292051 / 9930930188** {NC242962}

डोंबिवली पश्चिमेला ऑफिसमध्ये कामासाठी अनुभव असलेल्या मुले/ मुलीची आवश्यकता आहे. Call **9136846552.** {NC242963}

लोअरपरेल मध्ये कुरीयर डिलिव्हरी स्टाफ अर्जंट पाहिजेत. **9323929439** {NC242970}

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये ४ कलर ऑफसेटसाठी बॉयलर आणि फिडरमेन, हेल्पर पाहिजेत. संपर्क ११ ते ७ फोन - **9819996770 / 9930861233** {NC242938}

नाकोडा भैरव फाऊंडेशन हायटेक आणि डायग्नोस्टिक सेंटर आमच्या कांदिवली पश्चिम शाखेसाठी 10 तास / 12 तासासाठी हाऊसकिपिंग स्टाफ पाहिजेत. इच्छुकांनी संपर्क साधावा. खुशबू गढिया **7021621718 / 9920891941** {NC242936}

गुजरात कॅटरींगसाठी मुले पाहिजे. वय 18 ते 30. 800 रुपये रोज. संपर्कः हरेश भाई **9819710270** {NC242897}

चष्म्याच्या दुकानात कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजे. Computer येणे आवश्यक. वेळ 4.00 to 8.30 पगार 7000/- गिरगाव **9820835457** {NCC240074}

## Situation Vacant

12th pass packing food at Andheri airport Gross Salary 15553/- and ot extra food available on duty should be able to read in english. **9920998489** {NC242884}

## Situation Vacant

**Kotak Design House Pvt. Ltd.**
Ladies footwear manufacturer
**Job:** Stock management + Order management
**Education:** 12th Pass
MALE, English, computer, Hardworking
**Salary:** 25,000/- p.m.
**Timing:** Morning 6am to 6pm
**Contact : 9324875606**

SENIORS/ SMALL BUSINESS OWNERS/ HOMEMAKERS GET ASSOCIATED WITH INSURANCE. EARN 1,00,000/-+ MONTHLY. (WORKING FROM HOME). **94283 33827/ 82912 81700** {NC242934}

## व्यवसाय विषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - **9028160157** {NC242956}

## जागा विषयक

सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीतील घर पोयनाड अलिबाग येथे उपलब्ध. Collector / Bank Approved Project. 1 RK & 1 BHK. Starting Price 12.25 Lac onwards. Diwali offer Booking 50,000/- only. Call + **7700999220 / 9022272212.** {NC242925}

## विवाह विषयक

आमच्याकडे फोनवरून वधू-वर नोंदणी मोफत होते. लग्न जमत असेल तरच फी **8655859942 / 9619413439** {NC242940}

हिंदू, बौद्ध, ख्रिस्त समाजातील प्रथम, घटस्फोटीत, विधवा, विधुर वधु वरांची नोंदणी. विरार - **8087920719** {NC242933}


**निकोला टेस्ला यांना आठ भाषा अवगत होत्या त्यांनी २६ देशात जवळपास ३०० च्या वर पेटंट आणि असे कित्येक अविष्कार ज्यांचे पेटंट घेतलेले नाही. आज आपण जो टीव्ही रिमोट तसेच घरात स्वस्त वीज वापरतो याचं सर्व श्रेय निकोला टेस्ला यांना जातंय. आपल्या घराला उजाळा देणारी नियोन आणि फ्लोरीसेंट लाइट, लेजर बीम, एसी करंट, एक्स-रे, रोबोटिक्स यांचा शोध टेस्ला यांनी लावला.टेस्ला यांच्या आई-वडीलांना पाच मुलं होती. टेस्ला हे चौथे अपत्य होते.लहानपणापासूनच हुशार असलेल्या निकोला यांचे प्रायमरी शिक्षण १८६२ मध्ये पूर्ण केलं.पुढे १८७५ ला पॉलीटेक्नीकच्या द्वितीय वर्षाला अति हुशारीपणामुळे एका शिक्षकामध्ये आणि टेस्लामध्ये मतभेद झाले आणि त्या वर्षी ते नापास झाले, त्यातच त्यांना जुगार खेळायची सवय लागली. महिन्याला मिळणारा भत्ता आणि ट्युशन फी त्यांनी जुगारात उडवली. अभ्यास झाला नाही आणि ते फायनल परीक्षेत नापास झाले. त्यामुळे त्यांचे युनिव्हर्सिटी ग्रॅज्युएशन अपूर्ण राहिले.**

# ध्येयवेडा शास्त्रज्ञ
# निकोला टेस्ला

पुढे ते १८८१ मध्ये अंडर कन्स्ट्रक्शन असलेल्या बुडापेस्टमधील एका बुडापेस्ट टेलिफोन एक्स्चेंज कंपनीत मुख्य विद्युत अभियंता म्हणून नोकरीला लागले. इथे काम करत असताना केंद्रीय संचार उपकरणांत नवीन शोध लावून उपकरणे सुधारित केली आणि नवीन स्वरूपातला टेलिफोन एम्प्लीफायर बनवले पण त्याचे त्यांनी कधीच पेटंट घेतले नाही. पुढे ते १८८२ मध्ये थॉमस अल्वा एडिसन ह्यांच्या फ्रांस मधील कॉंटिनेंटल एडिसन कंपनीत विद्युत उपकरणे डिझाइन करणे आणि इम्पृव्ह करण्याचे काम ते करू लागले. पुढे १८८४ साली तेथून त्यांची बदली न्यूयॉर्क येथे झाली.टेस्ला यांनी एडिसनला हवे तसे बदल करून दाखवले. परंतु एडिसन यांनी आपला शब्द पाळला नाही. त्यांनी टेस्ला यांची चेष्टा केली आणि पगारवाढ देखील दिली नाही तेव्हा रागाने टेस्ला यांनी एडिसनची कंपनी सोडली. एडिसन यांची कंपनी सोडल्यानंतर १८८६ मध्ये त्यांनी दोन इनवेस्टर्स सोबत आपली स्वतःची Tesla Electric Light and Manufacturing नावाची कंपनी स्थापन केली. या कंपनीमध्ये त्यांनी डायनेमो इलेक्ट्रिक मशीन कम्युटेटर तयार केला. अमेरिकेतील हे त्यांचे पहिले पेटंट होते. या साठी जे. पी. मॉर्गन यांनी मदत केली.पुढे त्या इनवेस्टर्स सोबतही त्यांचे काही पटले नाही. ते टेस्लाला कंपनीतून बाहेर पडले. पुढची काही दिवस अगदीच हलाखीची गेली.१८८७ च्या काळात परत नवीन इनवेस्टर्स सोबत कंपनी स्थापना केली. इथं ते मोटर आणि जनरेटर वर काम करू लागले होता. त्याच काळात त्यानी Alternative Current (AC ) वर चालणारी Induction Motor बनवली होती. हा तोच काळ होता जिथं एडिसन चा DC Current आणि टेस्ला चा AC Current ह्यावर मोठं व्यावसाईक युद्ध सुरु झालं. दोघेही आपापले Current कसे चांगले आणि दुसऱ्याचे कसे खराब आहे हे सिद्ध करून दाखवू लागले. एडिसन ने AC Current चे भय उत्पन्न करण्यासाठी चक्क एका हत्तीला लोकांच्या समोर विजेच्या शॉक देऊन मारला आणि AC ची शक्ती किती विनाशकारी याचं प्रात्यक्षिक लोकांना दाखवल. परंतु AC Current चे वैशिष्ट्य असे की याचे वोल्टेज ट्रांसफोर्मर द्वारा वाढवून खुप दूर पर्यंत पाठवता येऊ शकत होते. DC मध्ये असे करता येत नाही. त्याच बरोबर AC प्रणालीवर चालणारी उपकरणे ऊठ उपकरणांच्या तुलनेत कमी वीज वापरतात. प्रत्येक घरात वीज ही केवळ -उ प्रवाहानेच पोहोचू शकत होती.त्या वेळी DC system प्रचंड मोठ्या प्रमाणावर लागू होती आणि एडिसन कंपनी ऊठ उपकरणेच बनवत होती. त्यामुळे एडिसनने या नवीन पद्धतीला विरोध केला.टेस्लाने उद्योगपती जॉर्ज वेस्टिंग हाउस याच्या सोबत नवीन कंपनी चालू केली.या कंपनीने AC प्रणालीचे महत्त्व जगाच्या समोर ठेवले. आज आपल्या घरी खांबावरून जी वीज येते ती टेस्ला यांची AC प्रणाली आहे. टेस्ला यांनी चक्रीय चुंबकीय क्षेत्राच्या सिद्धांताचा शोध लावला. त्यांचा एक आणखी महत्वपूर्ण अविष्कार म्हणजे AC Electric Motor होय. त्यांनी ह्या मोटारच्या साह्याने नायगरा धबधब्यावर पहिले जल विद्युत पावर स्टेशन तयार केले.त्या नंतर केवळ अमेरिकेतच नव्हे तर संपूर्ण जगानेच -उ विद्युत वितरण प्रणालीचा स्वीकार केला. १८९१ मध्ये टेस्ला यांना अमेरिकेची न्यूट्रलाइज नागरिकत्व मिळाले. त्याच काळात टेस्ला यांनी wireless power transmission ने वायर विरहित अंतरावर ठेवलेले ब्लब पेटवून त्याचे प्रात्यक्षिक दाखवले होते.

ह्याच काळात टेस्ला कॉईल चा शोध लागला. असे मानले जाते की टेस्ला यांनी १८९४ मध्ये Invisible Energy (आताचे क्ष-किरण) किरणांचा शोध लावला होता.परंतु १८९५ साली त्यांच्या प्रयोगशाळेत लागलेल्या आगीत शेकडो संशोधन मॉडेल, डिजाईन, नोट्स, फोटोस सर्व कागदपत्र आणि उपकरणे जाळून खाक झाले.ह्यामागे एडिसनचा हात होता असे देखील काहींचे म्हणणे आहे. टेस्ला ने रेडियो तरंगाचे (Radio Wave) ट्रान्समिशन करता येते, ह्या थेअरीज १८९३ मध्येच मांडल्या होत्या. वातावरणाच्या बाहेर रेडियो लहरी संपूर्ण जगात कोठेही पाठवता येऊ शकतात असा सिद्धांत मांडला. रेडियोत वापरत असलेला टेस्ला रॉडचा शोध त्यांनीच लावलेला आहे.



ह्याचे सादरीकरण करताना त्यांनी Radio Wave Controller वापरून एका बोटीला चालवून दाखवले. हा विषय लोकांमध्ये खूप कुतुहूल करणारा ठरला होता.लोकांना वाटायचे ही जादू आहे, टेलिपॅथी आहे किंवा ह्या बोटी मध्ये प्रशिक्षित माकड लपवले आहे. पण पुढे मार्कोनी नावाच्या संशोधकाला अश्याच Radio Wave Transmission बद्दल पेटंट मिळाले, ह्यावर टेस्ला आणि मार्कोनी ह्यांच्यात पेटंट युद्ध सुरु झालं. कोर्टात खुप काळ खटला चालला, पण पेटंट अखेर मार्कोनी यांना मिळाले. सध्या मार्कोनी याला रेडियोचा जनक मानले जात असले तरी सत्य असे आहे की या शोधात टेस्ला यांचेही तितकेच योगदान लाभले आहे. १८९९ ला त्यांनी Wireless Telegraphy चा शोध लावला त्याच सोबत कृत्रिम वीज निर्मिती सुद्धा केली. एका प्रयोगामध्ये त्यानी लाखो वोल्ट ताकदीची आकाशातील वीज निर्माण केली. त्या विजेचा गडगडाट एवढा मोठा होता की २५ किलोमीटर पर्यंत लोकांना ऐकू येत होता. ह्या प्रयोगा दरम्यान लोकांच्या मनात भीती निर्माण झाली होती. त्यांनी पुढे हा पण दावा केला की Wireless Telegraphy प्रयोगा दरम्यान उभ्या केलेल्या रिसीव्हर टॉवर मधून काही अज्ञात सिग्नल मिळाले होते जे की त्यांच्या मते एखाद्या परग्रहावरून एलियन्सनी धाडले होते. ज्या कामासाठी इन्वेस्टर्सनी पैसा लावला होता ते काम न करता टेस्ला यांनी दुसरेच शोध लावले होते त्यामुळे सर्व इन्वेस्टर्सनी त्यांची लॅब बंद पाडली. १९०६ ला ५० व्या वाढदिवसाला त्याने ब्लेड नसलेल टर्बाईन बनवले त्याचा वापर करून त्यानी कोलोराडो धबधब्यात पॉवर स्टेशन बसवले. १९१२ मध्ये ब्रेनला इलेक्ट्रीक शॉक देऊन ब्रेन अधिक क्रियाशील करण्याच्या थेअरी त्यानी मांडल्या, त्यावर काही प्रयोग देखील केले. १९१७ मध्ये त्यानी आताच्या रडार प्रणाली सारखी 'इलेक्ट्रिक रे' ही प्रणाली पाणबुडी शोध घेण्यासाठी मांडली होती पण याबाबतीत त्यांचे बहुतांश अंदाज चुकीचे ठरले. टेस्लाने Death Ray ह्या मशीनचा शोध लावल्याचा दावा केला! त्यांच्या दाव्यानुसार जवळपास ३०० किलोमीटर दूर बॉर्डरवरून हवेमध्ये असे काही किरणे सोडायचे की त्यामुळे शत्रूची १० हजार फूट उंचीवरील विमाने खाली पाडणे शक्य होईल. हॉलीवूडच्या The Prestige ह्या चित्रपटात टेस्ला ह्यांची wireless power transmission सोबत अनेक शोध दाखवले आहेत. निकोला टेस्ला यांच्या स्मरणार्थ अमेरिकेत १० जुलै हा दिवस टेस्ला दिवस म्हणून साजरा केला जातो. टाईम मासिकाने त्यांच्या ७५ व्या Birthday निमित्त आपल्या उँीशी झरसश वर त्यांना स्थान दिले होते.या मुहूर्तावर ७० महान वैज्ञानिकांनी त्यांची प्रशंसा केली होती. ह्या कार्यक्रमाला आईनस्टाईन देखील होते.भौतिक चुंबकीय क्षेत्राला त्यांच्या नावावरून टेस्ला हे युनिट देण्यात आल. त्यांच्या नावाने काही अवॉर्ड्स सुद्धा मिळतात. १९५६ मध्ये टेस्ला सोसायटीची स्थापना झाली. चंद्रावर पृथ्वी पासून दूर असलेल्या एका २६ किलोमीटर व्यासाच्या क्रेटर ला टेस्ला नाव देण्यात आले आहे. एका सूक्ष्म ग्रहाचे नाव २२४४ टेस्ला ठेवण्यात आले आहे. सर्बियाच्या बेलग्रेड विमान तळाचे नाव टेस्ला आहे. सर्बियाच्या विद्युतगृहाचे नाव टेस्लाच्या नावावरून देण्यात आले आहे. अमेरिकेत विद्युत कार निर्माण करणाऱ्या कंपनीचे नाव टेस्ला मोटर्स आहे. त्यांच्या नावे टेस्ला पुरस्कार दिला जातो. बेलग्रेड इथे निकोला टेस्ला संग्रहालय देखील आहे. वॉशिंग्टन मध्ये त्यांच्या नावे काही शाळा, महाविद्यालये आहेत सर्बियाच्या १०० दिनारच्या नोटेवर टेस्ला यांचे चित्र आहे. नायगरा फॉल वरती टेस्ला यांचा मोठा पुतळा आहे.

संजीव वेलणकर
पुणे

# राशीभविष्य

शनिवार, दि. २ नोव्हेंबर २०२४

संजय मनोहर

**मेष** – अडचणी आल्या तरी मार्ग निघेल. कामात नशिबाची साथ लाभेल. पैशाच्या बाबतीत हिशोबी चौकस असावे.

**वृषभ** – नोकरीत संधी चालून येतील. प्रवास आनंदमय होतील. देण्याघेण्याच्या व्यवहारांवरून मतभेद होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

**मिथुन** – अचानक येणाऱ्या कामाच्या ताणामुळे मानसिक अस्वस्थता जाणवेल. नोकरीत आळशी प्रवृत्ती नुकसानदायक ठरेल. मित्रांशी खरे खोटे करण्याच्या भानगडीत पडू नये.

**कर्क** – मित्रांबाबतीत गोष्टी गृहीत धरून चालू नये. पैशाची उपलब्धता होईल, त्या प्रमाणात खर्चही वाढेल. सत्संग लाभेल.

**सिंह** – नोकरीत सहकाऱ्यांवर अवलंबून राहू नये. संततीची मते विचारात घेऊन निर्णय घ्यावेत. वाहने जपून चालवावीत.

**कन्या** – लोकांच्या विचित्र वागण्याचा त्रास होईल निर्णयाचा फेरविचार करावा लागेल. वस्तुस्थितीला सामोरे जाताना काळजी घ्यावी.

**तूळ** – भावंडांचे सहकार्य लाभेल. तुमची मध्यस्थी फायदा देईल. अडून राहिलेले पैसे मिळतील.

**वृश्चिक** – भागीदारीतून लाभ संभवतो. घरात वादविवाद वाढणार नाहीत, याची काळजी घ्यावी. निर्णय घेताना गुंतवणुकीच्या व्यवहारात ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल.

**धनु** – महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेताना फेरविचार उपयोगी पडेल. आपापसात निर्माण झालेले ताणतणाव सामंजस्याने कमी करू शकाल. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्याल.

**मकर** – घरात पाहुण्यांची वर्दळ वाढेल. सहकाऱ्यांच्या कृतीमुळे हातात पडणाऱ्या गोष्टी दूर ढकलल्या जातील. घरात खेळीमेळीचे वातावरण राहील. खर्चाचे गणित जमवू शकाल.

**कुंभ** – गरजेनुसार मतपरिवर्तन करणाऱ्यांपासून दोन हात दूर राहावे. पगारवाढीच्या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील. संततीसंदर्भातील अमाप खर्च वादविवाद वाढवेल.

**मीन** – मनात योजलेल्या गोष्टीविरुद्ध घडत असल्याचे अनुभवास येईल. तुमच्या स्वभावाचा नातेवाईक, मित्रांकडून फायदा उठवला जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आध्यात्मिक प्रगती होईल.

## निकाल – महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी – सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 44 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 1213 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 1164 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 8121 | 5028 | 4326 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3172 | 5810 | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3333 | 5539 | 6947 | 8495 | 9589 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0425 | 3470 | 3722 | 5321 | 6761 | 7088 | 7919 | 8029 | 8894 | 9342 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1992 | 2571 | 2901 | 2947 | 3226 | 3644 | 3876 | 5714 | 6321 | 7382 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0540 | 1261 | 2149 | 2845 | 3438 | 4479 | 5614 | 6515 | 7518 | 8623 |
| | 0562 | 1311 | 2175 | 2853 | 3462 | 4500 | 5622 | 6616 | 7550 | 8662 |
| 0004 | 0590 | 1369 | 2215 | 2865 | 3463 | 4526 | 5656 | 6618 | 7647 | 8711 |
| 0036 | 0613 | 1391 | 2246 | 2903 | 3537 | 4688 | 5677 | 6620 | 7671 | 8741 |
| 0048 | 0636 | 1392 | 2247 | 2919 | 3547 | 4740 | 5701 | 6718 | 7687 | 8788 |
| 0062 | 0682 | 1474 | 2262 | 2962 | 3653 | 4774 | 5728 | 6888 | 7717 | 8824 |
| 0073 | 0808 | 1490 | 2271 | 3013 | 3736 | 4787 | 5753 | 6890 | 7727 | 8880 |
| 0098 | 0848 | 1527 | 2322 | 3032 | 3793 | 4814 | 5758 | 6993 | 7828 | 9310 |
| 0100 | 0880 | 1554 | 2358 | 3051 | 3978 | 4914 | 5787 | 6997 | 7841 | 9339 |
| 0139 | 0892 | 1597 | 2402 | 3063 | 4052 | 5056 | 5805 | 7012 | 8030 | 9442 |
| 0256 | 0994 | 1598 | 2502 | 3071 | 4067 | 5207 | 5850 | 7095 | 8184 | 9509 |
| 0270 | 1007 | 1774 | 2503 | 3077 | 4144 | 5209 | 5893 | 7101 | 8278 | 9589 |
| 0276 | 1020 | 1778 | 2526 | 3133 | 4286 | 5357 | 6070 | 7123 | 8367 | 9660 |
| 0407 | 1125 | 1875 | 2529 | 3193 | 4294 | 5393 | 6152 | 7207 | 8374 | 9681 |
| 0430 | 1135 | 1910 | 2552 | 3295 | 4374 | 5452 | 6226 | 7376 | 8403 | 9758 |
| 0462 | 1141 | 1959 | 2597 | 3338 | 4409 | 5535 | 6244 | 7404 | 8480 | 9799 |
| 0470 | 1157 | 1988 | 2722 | 3351 | 4416 | 5542 | 6258 | 7471 | 8481 | 9874 |
| 0505 | 1169 | 2052 | 2792 | 3356 | 4442 | 5574 | 6316 | 7477 | 8602 | 9969 |
| 0527 | 1220 | 2125 | 2827 | 3377 | 4473 | 5611 | 6364 | 7510 | 8607 | 9973 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र सह्याद्री मासिक सोडत – सोडत क्र. 11 सोडत दिनांक 01/11/2024

| मालिका | MS-2411 A | MS-2411 B | MS-2411 C | MS-2411 D | MS-2411 E |
|---|---|---|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 11 लाख (रु. 11 लाखाची 2 बक्षिसे) | — | 19444 | — | 43098 | विराग एन्टरप्रायझेस, नाशिक |
| प्रोत्साहनपर बक्षिस 9000/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | | 19444 | | 43098 | |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 10,000/- | 9984 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0085 | 0207 | 0248 | 0347 | 1196 | 2691 | 4022 | 4682 | 5655 | 6354 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0315 | 0553 | 1248 | 4008 | 4141 | 4267 | 5011 | 5386 | 7215 | 7673 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0082 | 1207 | 1904 | 2517 | 3741 | 4090 | 5728 | 5752 | 8641 | 9282 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0709 | 0767 | 1258 | 2353 | 4100 | 5656 | 7126 | 7999 | 8333 | 9512 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षिस रु. 150/- | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1217 | 2048 | 2826 | 3457 | 4261 | 5003 | 5592 | 6452 | 7110 | 7892 | 8454 | 9162 |
| | | 1219 | 2061 | 2834 | 3471 | 4275 | 5014 | 5616 | 6481 | 7128 | 7893 | 8476 | 9260 |
| | | 1221 | 2073 | 2836 | 3480 | 4294 | 5019 | 5729 | 6494 | 7144 | 7894 | 8543 | 9261 |
| 0009 | 0724 | 1224 | 2083 | 2853 | 3510 | 4309 | 5025 | 5740 | 6637 | 7147 | 7918 | 8549 | 9270 |
| 0032 | 0730 | 1229 | 2120 | 2871 | 3532 | 4318 | 5037 | 5778 | 6653 | 7235 | 7928 | 8557 | 9303 |
| 0033 | 0741 | 1255 | 2193 | 2884 | 3535 | 4343 | 5044 | 5790 | 6688 | 7287 | 7932 | 8568 | 9353 |
| 0043 | 0758 | 1303 | 2210 | 2893 | 3604 | 4387 | 5057 | 5806 | 6697 | 7364 | 7958 | 8590 | 9354 |
| 0074 | 0819 | 1336 | 2247 | 2962 | 3655 | 4394 | 5066 | 5814 | 6700 | 7367 | 7979 | 8676 | 9370 |
| 0098 | 0852 | 1361 | 2274 | 2963 | 3678 | 4405 | 5109 | 5894 | 6706 | 7399 | 7994 | 8708 | 9377 |
| 0108 | 0893 | 1411 | 2306 | 2983 | 3758 | 4428 | 5111 | 5906 | 6738 | 7425 | 8002 | 8709 | 9397 |
| 0122 | 0943 | 1442 | 2321 | 3088 | 3764 | 4455 | 5121 | 5952 | 6739 | 7464 | 8019 | 8712 | 9518 |
| 0259 | 0946 | 1475 | 2328 | 3101 | 3774 | 4478 | 5143 | 5975 | 6740 | 7472 | 8041 | 8718 | 9576 |
| 0266 | 0954 | 1476 | 2334 | 3106 | 3794 | 4486 | 5182 | 5982 | 6749 | 7499 | 8120 | 8736 | 9612 |
| 0279 | 0967 | 1501 | 2337 | 3153 | 3893 | 4503 | 5196 | 5989 | 6764 | 7573 | 8162 | 8738 | 9653 |
| 0297 | 0976 | 1532 | 2383 | 3155 | 3898 | 4514 | 5203 | 6005 | 6799 | 7605 | 8172 | 8793 | 9680 |
| 0304 | 0985 | 1625 | 2424 | 3158 | 3920 | 4524 | 5211 | 6106 | 6806 | 7619 | 8181 | 8796 | 9681 |
| 0320 | 1003 | 1633 | 2453 | 3170 | 3972 | 4551 | 5213 | 6114 | 6820 | 7636 | 8184 | 8798 | 9718 |
| 0357 | 1033 | 1645 | 2479 | 3182 | 3983 | 4575 | 5266 | 6136 | 6864 | 7683 | 8185 | 8800 | 9746 |
| 0410 | 1035 | 1646 | 2523 | 3211 | 3992 | 4589 | 5301 | 6137 | 6885 | 7686 | 8207 | 8878 | 9766 |
| 0414 | 1055 | 1694 | 2534 | 3227 | 4008 | 4622 | 5304 | 6157 | 6897 | 7694 | 8212 | 8909 | 9770 |
| 0445 | 1084 | 1748 | 2575 | 3237 | 4010 | 4663 | 5331 | 6187 | 6903 | 7703 | 8218 | 8923 | 9788 |
| 0453 | 1122 | 1775 | 2636 | 3260 | 4019 | 4704 | 5349 | 6241 | 6910 | 7757 | 8233 | 8936 | 9823 |
| 0460 | 1125 | 1811 | 2641 | 3264 | 4057 | 4715 | 5413 | 6254 | 6912 | 7761 | 8304 | 8938 | 9855 |
| 0493 | 1136 | 1840 | 2642 | 3275 | 4114 | 4743 | 5434 | 6276 | 6916 | 7785 | 8351 | 8943 | 9890 |
| 0511 | 1144 | 1848 | 2667 | 3315 | 4178 | 4744 | 5455 | 6371 | 6940 | 7806 | 8369 | 9015 | 9905 |
| 0531 | 1153 | 1965 | 2668 | 3384 | 4187 | 4864 | 5478 | 6388 | 6990 | 7807 | 8376 | 9016 | 9918 |
| 0564 | 1178 | 1973 | 2767 | 3398 | 4213 | 4895 | 5505 | 6392 | 7009 | 7811 | 8397 | 9032 | 9958 |
| 0574 | 1198 | 1987 | 2787 | 3414 | 4254 | 4919 | 5518 | 6402 | 7073 | 7826 | 8406 | 9048 | 9972 |
| 0700 | 1216 | 1997 | 2791 | 3427 | 4259 | 4968 | 5528 | 6444 | 7105 | 7880 | 8439 | 9080 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# निवडणूक प्रशिक्षण टाळणाऱ्या १५० कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावल्या

■ नाशिक

मालेगाव बाह्य विधानसभा मतदारसंघ ११५ साठी २२५९ कर्मचाऱ्यांकरिता घेण्यात आलेल्या एक दिवसीय प्रशिक्षणाला गैरहजर राहिलेल्या १५० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच या कर्मचाऱ्यांना २४ तासाच्या आत खुलासा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हा खुलासा असमाधानकारक असल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार कायदेशीर कडक कारवाई करण्याचा इशारा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

नाशकातील एटीटी विद्यालयात व मोहन सिनेमागृहांत दोन सत्रात सकाळी १० ते १ व दुपारी २ ते ५ यावेळेत निवडणूक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. मालेगाव बाह्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन (क्र.२) पल्लवी निर्मळ, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मालेगाव तहसीलदार विशाल सोनवणे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या निवडणूक प्रशिक्षणास टाळाटाळ करणारे, गैरहजर राहणाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार कारवाई करण्याचा इशारा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला.

# कुरुक्षेत्रमध्ये धावत असताना हरियाणाचे मुख्यमंत्री पडले

■ कुरुक्षेत्र

कुरुक्षेत्र द्रोणाचार्य स्टेडियमवर झालेल्या रन फॉर युनिटी कार्यक्रमात धावत असताना हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांचा धावत असताना तोल जाऊन ते जमिनीवर पडले. त्यावेळी सुरक्षारक्षकांनी त्यांना सावरले.

देशाचे माजी उपपंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हरियाणा सरकारने प्रत्येक जिल्ह्यांत रन फॉर युनिटी कार्यक्रम आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी कुरुक्षेत्र येथे नायब सैनी आले होते. या कार्यक्रमात अनेक धावपटू सहभागी झाले होते. या कार्यक्रमातील शर्यतीला सैनी यांनी हिरवा झेंडा दाखवला आणि ते स्वतःही धावले. ते धावत असताना त्यांच्या शेजारी धावणाऱ्या एका धावपटूचा चुकून त्यांना धक्का लागला. त्यावेळी सैनी यांचा तोल गेला आणि ते जमिनीवर कोसळले. मात्र, सुरक्षारक्षकांनी त्यांना सावरताच ते लगेच उठले.

# धुळ्यात एका रात्रीत ४९ क्विंटल कांदा लंपास

■ धुळे

नाशिकसह कांदा पट्ट्यात चोरीच्या घटना घडत आहेत. आता धुळे जिल्ह्यातही अशीच घटना घडली आहे.साक्री तालुक्यातील सामोडे येथील चोरट्यांनी गोदाम फोडून दोन लाख रुपये किमतीचा ४९ क्विंटल कांदा लंपास केल्याची घटना घडली.

साक्री येथील रहिवासी आणि नवापूर येथील प्राथमिक शिक्षक हर्षवर्धन सोनवणे यांच्या पत्नी स्मिता सोनवणे यांचा कांदा खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. कांदा हा सामोडे शिवारातील आशापुरी काट्याजवळ आदित्य ट्रेडिंग नावाच्या गोडाऊनमध्ये ठेवला होता. २९ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास देखरेखीचे काम करणारे अनिल वानखेडे हे जेवणासाठी घरी गेले. त्यानंतर रात्री अज्ञात चोरट्यांनी सुमारे १४० गोण्यांमध्ये भरून ठेवलेला १ लाख ९६ हजार रुपये किमतीचा सुमारे ४९ क्विंटल कांदा चोरून नेला.

# राजू शेट्टींना धक्का! जिल्हाध्यक्षाचा रामराम

■ कोल्हापूर

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष वैभव कांबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी संघटनेला रामराम ठोकला आहे . वैभव कांबळे यांनी संघटनेतून बाहेर पडतानाच राजू शेट्टी हुकुमशाह पद्धतीने वागवत असल्याचा आरोप केला. वैभव कांबळे यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत राजू शेट्टी निर्णय घेत असताना स्वाभिमानी संघटनेच्या कुठल्याही नेत्यांना अथवा कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता एककल्ली कार्यक्रम करत आहेत. राजू शेट्टी हे हुकुमशाह पद्धतीने संघटनेत वागत आहे. त्यांच्या कारभाराला कंटाळून आम्ही आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. रात्रीत अशा काय घडामोडी घडल्या की माझी उमेदवारी कापली गेली. राजू शेट्टी यांच्या या कारनाम्यांचा पर्दाफाश लवकरच करणार आहे.

## निकाल – गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी – सोडत संध्या. 5:00

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 44 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/11/2024

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-03 : 3654 | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7997 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 5418 (अग्रवाल लॉटरी एजन्सी, पुणे) | 6088 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 7495 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 7947 | 8574 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| चौथे बक्षिस रु. 400/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1911 | 2796 | 3930 | 4571 | 5531 | 6096 | 7082 | 7947 |
| 1018 | 1988 | 2935 | 4144 | 4859 | 5560 | 6190 | 7122 | 7971 |
| 1069 | 2173 | 2992 | 4179 | 4945 | 5568 | 6430 | 7252 | 7983 |
| 1172 | 2228 | 3039 | 4401 | 5000 | 5663 | 6461 | 7514 | 8031 |
| 1176 | 2427 | 3296 | 4409 | 5075 | 5679 | 6634 | 7646 | 8062 |
| 1412 | 2486 | 3396 | 4430 | 5106 | 5755 | 6639 | 7761 | 8665 |
| 1446 | 2532 | 3397 | 4504 | 5164 | 5880 | 6715 | 7766 | 8698 |
| 1534 | 2546 | 3407 | 4506 | 5465 | 5943 | 6726 | 7810 | 8848 |
| 1869 | 2627 | 3669 | 4524 | 5507 | 5956 | 6872 | 7932 | 8882 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल – महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र सह्याद्री • राजलक्ष्मी विकली लॉटरी • – सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 44 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 01/11/2024

| बक्षिस | | | |
|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SR-02 : 5805 | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4246 | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2356 (सुमित एजन्सी - मुंबई) | 2876 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 4611 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1131 | 2142 | 2777 | 4401 | 5507 |
| 1158 | 2146 | 2805 | 4426 | 5583 |
| 1265 | 2181 | 2842 | 4540 | 5677 |
| 1676 | 2231 | 2862 | 4994 | 5686 |
| 1857 | 2262 | 2936 | 5009 | 5752 |
| 1865 | 2380 | 3440 | 5300 | 5776 |
| 2067 | 2515 | 3804 | 5321 | 5791 |
| 2088 | 2574 | 3805 | 5424 | 5854 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## २४ तासांत १०० विमानांना मिळाली बॉम्बची धमकी



■ मुंबई

**मागील** काही दिवसांपासून विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी देण्याच्या प्रकारांत वाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत तर देशातील विविध विमान कंपन्यांना आलेल्या धमक्यांची संख्या १०० पेक्षा जास्त अधिक असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विमानात बॉम्ब असल्याच्या धमक्यांमुळे या विमानांचे आपत्कालीन लँडिंग करावे लागले. त्यानंतर निर्धारित नियमांनुसार त्यांची तपासणी करण्यात आली. मात्र, या तपासणीदरम्यान या विमानांमध्ये कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. यामुळे या विमानांना किमान तीन ते चार तास विलंब झाला आणि याचा फटका प्रवाशांना बसला.

धमकी आलेल्या विमानांमध्ये एअर इंडिया कंपनीच्या ३६, विस्ताराच्या ३५ आणि इंडिगो कंपनीच्या ३२ विमानांचा समावेश आहे. दरम्यान, गेल्या १६ दिवसांत ५१० विमानांना धमकी आली होती.

## नवीन पटनाईकांची सुरक्षा कमी केली



■ भूवनेश्वर

**ओडिशात** भाजपाचे सरकार आल्यावर माजी मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांची सुरक्षा व्यवस्था घटवली असून, त्यांना आता 'झेड'ऐवजी 'वाय' सुरक्षा पुरवली जाणार आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अनेक अधिकाऱ्यांना माघारी बोलावले आहे. ओडिशा सरकारच्या नुकत्याच झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत राज्यातील महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार नवीन पटनाईक यांच्या सुरक्षेसाठी आता केवळ दोन हवालदार दर्जाचे पोलीस कर्मचारी तैनात असतील.

देश विदेश

## नेपाळी नोटेवरील नकाशात तीन भारतीय ठिकाणे दाखवली

### ३० कोटी नोटा छापणार

■ काठमांडू



**नेपाळ** राष्ट्रीय बँक या नेपाळच्या केंद्रीय बँकेने १०० रुपयांच्या नोटा छापण्याचे कंत्राट चीनच्या कंपनीला दिले आहे. चिनी कंपनीकडून छापण्यात येणाऱ्या नोटांवरील नकाशात भारतीय हद्दीतील लिपुखेल, लिंपियाधुरा व कालापानी ही तीन ठिकाणे नेपाळचा भाग असल्याचे दाखवण्यात आल्याचा दावा एका वृत्तसंस्थेने केला आहे. त्यामुळे भारत-नेपाळमध्ये पुन्हा एकदा सीमावादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. या ठिकाणांबाबत भारत आणि नेपाळमध्ये ३५ वर्षांपासून वाद सुरू आहे.

चीनच्या 'बँक नोट प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन' या कंपनीला नोटा छापण्याचे कंत्राट नेपाळने दिले आहे. ही कंपनी नेपाळमधील शंभर रुपयांच्या ३० कोटी नोटा छापणार आहे. यासाठी नेपाळला ७५ कोटी भारतीय रुपये एवढा खर्च येणार आहे. याचा अर्थ शंभर रुपयांची एक नोट छापण्यासाठी नेपाळला २.५० भारतीय रुपये मोजावे लागणार आहेत.

## पाकिस्तानातील लाहोरमध्ये ग्रीन लॉकडाऊन सुरू

■ लाहोर


**आय क्यू एअर** या हवेची गुणवत्ता मोजणाऱ्या संस्थेने जगातील १०० प्रदूषित शहरांची यादी जाहीर केली होती. त्यात पाकिस्तानातल्या लाहोर शहराचाही समावेश आहे. त्यामुळे लाहोरमध्ये ग्रीन लॉकडाऊन लागू करण्याचा निर्णय तिथल्या पंजाब सरकारने घेतला आहे. आय क्यू एअरच्या सर्व्हेक्षणात लाहोर शहराच्या प्रदूषणाची पातळी ७०० च्या वर गेल्याचे आढळले. याची पाकिस्तानातील पंजाब प्रांतातल्या मरियम नवाझ सरकारने गंभीर दखल घेतली आणि लाहोरला प्रदूषणमुक्त करण्यासाठी ग्रीन लॉकडाऊनचा निर्णय घेतला.

## जमिनीच्या वादातून दिल्लीत काका-पुतण्याची हत्या

**नवी दिल्ली** - जमिनीच्या वादातून काल नवी दिल्लीत काका-पुतण्याची गोळी झाडून हत्या करण्यात आली. या गोळीबारात एक १० वर्षांचा मुलगाही जखमी झाला आहे.

दिल्लीच्या शहादरा येथील बिहारी कॉलनीत राहणारे आकाश शर्मा आपला पुतण्या ऋषभ व १० वर्षांचा मुलगा कृष यांच्याबरोबर दिवाळी साजरी करत होते. यावेळी दोघेजण स्कूटरवर आले. त्यातील एकाने त्यांना बोलण्यात गुंतवून ठेवले. त्याचवेळी दुसऱ्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांचा पुतण्या हल्लेखोरांमागे धावला असता, हल्लेखोराने त्याच्यावरही गोळ्या झाडल्या.

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ पद्मश्री बिबेक देबरॉय यांचे निधन



■ नवी दिल्ली

**भारतातील** नामवंत अर्थतज्ज्ञ आणि पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष पद्मश्री बिबेक देबरॉय यांचे आज पहाटे निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. देबरॉय हे पुण्याच्या गोखले राजकारण आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलपती राहिले आहेत. ते २०१९ पर्यंत नीति आयोगाचे सदस्य होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून, वृत्तपत्रांमध्येही विपूल लेखन केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देबरॉय यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले. त्यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. देबरॉय यांचा अर्थकारणाव्यतिरिक्त इतिहास, संस्कृती, अध्यात्म अशा विविधांगी विषयांचा गाढा अभ्यास होता. देशातल्या अव्वल धुरिणांच्या मांदियाळीत त्यांचे नाव घेतले जाते. सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून देशाची ध्येयधोरणे ठरविण्यात ते वाक्बगार होते, असे मोदी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## रशियामध्ये गुगल दिवाळखोर घोषित

■ मास्को

**रशियातील** एका न्यायालयाने गुगलला २० डेसिलीयन डॉलर्सचा दंड केला आहे. ही रक्कम संपूर्ण जगाच्या जीडीपीच्या ६२० पटीने अधिक आहे. त्यामुळे गुगलला दिवाळखोर घोषित करण्यात आले.

गुगलने २०२० मध्ये रशिया समर्थक १७ युट्युब चॅनल्सना बॅन केले होते. याप्रकरणी त्या चॅनल्सनी गुगल विरुद्ध न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने २०२० मध्ये झालेल्या सुनावणीत गुगलने घातलेली युट्युब चॅनल्सवरची बंदी हटवेपर्यंत प्रतिदीन गुगलवर १ लाख दंड आकारला होता. त्यासाठी गुगलला ९ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता.

## बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत! ट्रम्पकडून निषेध



■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी बांगलादेशातील हिंदूंवरील हिंसाचाराचा निषेध केला आहे. गुरुवारी सोशल मीडियावर दिवाळीच्या शुभेच्छा देताना त्यांनी कमला हॅरिस यांच्यावरही टीका केली. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहिली आहे की, बांगलादेशात जमाव हिंदूंवर हल्ले करत आहेत आणि लुटत आहेत. तेथे अराजकतेची स्थिती आहे. त्यांच्या कार्यकाळात असे कधीच घडले नसते. कमला आणि बायडेन यांनी अमेरिकेसह जगभरातील हिंदूंची उपेक्षा केली आहे. मी राष्ट्राध्यक्ष झालो तर त्यांचे रक्षण करेन.

कट्टरपंथी डाव्यांच्या धर्मविरोधी अजेंड्यापासून हिंदूंचे संरक्षण करू असेही ट्रम्प म्हणाले. त्यांनी पंतप्रधान मोदींचे त्यांचे चांगले 'मित्र' म्हणून वर्णन केले आणि भारतासोबत चांगले संबंध प्रस्थापित करण्याचे सुतोवाच केले. ट्रम्प म्हणाले की, आम्ही अमेरिकेला पुन्हा मजबूत करू आणि येथे शांतता प्रस्थापित करू. बांगलादेश हिंसाचाराच्या मुद्द्यावर ट्रम्प यांनी वक्तव्य करण्याची ही पहिलीच वेळ आहे.



दिवाळीनिमित्त नवी मुंबई महापालिका विद्युत रोषणाईने उजळून गेली ....

## कणकवलीच्या पटवर्धन चौकातील आर. बी. बेकरीसह दुकानांना आग

■ कणकवली

**कणकवली** शहरातील पटवर्धन चौक येथील आर.बी. बेकरीला आज पहाटे आग लागली. या बेकरीतील संपूर्ण फर्निचर आणि सामान जळून खाक झाले होते. या बेकरीला लागून असलेल्या राजू गवाणकर यांचे कार्यालय, बर्डे मेडिकल आणि अन्य दुकानांनादेखील आगीची झळ बसली. नगरपंचायतच्या अग्निशमन जवानांनी या आगीवर नियंत्रण मिळवले. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज आहे. या घटनेची माहिती मिळताच आमदार नितेश राणे यांनी घटनास्थळी भेट देऊन दुकान मालकांची विचारपूस केली. तुम्ही घाबरून जाऊ नका, मी आपल्या पाठीशी आहे. मी सर्वतोपरी लागणारी मदत करेन. पुढील काळात अशा पद्धतीच्या घटना होऊ नयेत म्हणून काळजी घेतली जाईल, असे आश्वासन नितेश राणे यांनी दिले.

## चेंबूरमध्ये सर्व ११ अपक्ष उमेदवारांना अपात्र ठरविल्याने मोठी खळबळ

### ६ उमेदवारांमध्ये लढत होणार

■ मुंबई

**चेंबूर** विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज भरलेल्या सर्व अपक्ष उमेदवारांना छाननी प्रक्रियेत अपात्र ठरविण्यात आले आहे. यामुळे खळबळ माजली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी पक्षपातीपणा केल्याचा आरोप या अपक्ष उमेदवारांनी केला आहे. या अन्यायाविरोधात न्यायालयात जाण्याचा इशाराही या सर्वांनी दिला आहे. यासंदर्भात अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरून अपात्र ठरलेले आशिष गडकरी यांनी खास पत्रकार परिषदेत सांगितले की, चेंबूर मतदारसंघात सर्वच अपक्ष उमेदवारांना बेदखल करण्याच्या हेतूने रचलेला हा डाव असल्याचा आमचा संशय आहे.

या मतदारसंघात एकूण १७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यातील ६ जण हे राजकीय पक्षांचे उमेदवार होते. उर्वरित ११ जण हे अपक्ष उमेदवार होते. या सर्वांचे उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले होते. मात्र दुसऱ्या दिवशी छाननी प्रक्रियेत केवळ अपक्ष उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात आले. शपथ घेतली नाही, एका अनुमोदकाची सही राहिली आहे अशी कारणे पुढे करत हे अर्ज रद्दबातल केले आहेत. वास्तविक आम्ही सर्व अपक्ष उमेदवार पहिल्यांदाच निवडणूक प्रक्रियेला सामोरे जात होतो. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरताना आणि त्याची प्राथमिक तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्या त्रुटी आम्हाला सांगणे गरजेचे होते. पण तसे काहीच केले नाही आणि आमचा अर्ज स्विकारला.

## पार्किंगच्या वादातून निवृत्त लष्करी जवानाकडून गोळीबार! चालक ठार

■ पुणे

**येरवडा** येथील अशोकनगर परिसरात पार्किंगच्या वादातून काल रात्री एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने एका व्यक्तीवर गोळीबार केल्याची घटना घडली. यावेळी एक गोळी टेम्पोचालकाला लागून उपचारदरम्यान त्याचा मृत्यू झाला. शहानवाज शेख असे गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या टेम्पोचालकाचे नाव आहे. तर सेवानिवृत्त लष्करी जवान श्रीकांत पाटील असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार येरवडा भागातील अशोकनगर परिसरात पाटील व शहानवाज यांच्यात काल रात्री उशिरा पार्किंगच्या कारणावरून वाद झाला. या वादातून रागातून पाटील यांनी शहानवाजवर गोळीबार केला. या गोळीबारात जखमी झालेल्या शहानवाज यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

## उमेदवारीसाठी पाचव्यांदा पक्ष बदलून गावित निवडणूक रिंगणात

■ पालघर

**विधानसभा** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री राजेंद्र गावितांनी पाचव्यांदा पक्ष बदलून शिवसेनेच्या शिंदे गटातून पालघरची उमेदवारी मिळवली आहे. मात्र उमेदवारीसाठी बेडूक उड्या मारणाऱ्या गावितांवर पालघरचा मतदार नाराज असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे भूमिपुत्रांचे प्रतिनिधी असलेले ॲड. विराज गडग यांचे मोठे आव्हान गावितांसमोर असणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी पालघरचे आमदार श्रीनिवास वनगा यांचा पत्ता कट करत राजेंद्र गावित यांना संधी दिली आहे. त्यामुळे नाराज झालेल्या श्रीनिवास वनगा यांना राजकीय पुनर्वसन करण्याचा मुख्यमंत्री शिंदे यांनी शब्द दिला असल्याची चर्चा स्थानिक राजकारणात सुरू आहे. भाजपातून शिवसेनेत आलेल्या गावितांना विजयी करण्यासाठी वनगा किती प्रयत्न करतात या चर्चेलाही राजकीय वर्तुळात तोंड फुटले आहे.



आदिवासी समाजातील एक सुशिक्षित तरुण म्हणून ओळखले जाणारे ॲड. विराज गडग हे यंदाही विधानसभा लढवित आहेत. यावेळी गडग यांचेच मोठे आव्हान गावितांसमोर असणार आहे. २०१९ मध्ये वंचित बहुजन आघाडीतर्फे उभे राहिलेल्या विराज गडग यांना ११,४६९ मते मिळाली होती.


## वसईच्या सातिवलीतील लक्ष्मी इंडस्ट्रीजमध्ये आग

■ वसई

**वसईच्या** सातिवली येथील लक्ष्मी इंडस्ट्रीज येथील एका गाळ्याला भीषण आग लागली. या गाळ्यात प्लास्टिकचे सामान असल्यामुळे आगीने रौद्र रुप धारण केले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कंपनीतील सर्व सामान जळून खाक झाले आहे. ही आग कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट नसले तरी फटाक्यामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला.

## उमेदवारांचा नवा प्रचार फंडा मतदारांना रेकॉर्डिंग कॉल सुरू

■ नांदेड




**येत्या** २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे प्रचारासाठी मोजकेच दिवस असल्याने आता उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नवा हायटेक फंडा सुरू केला आहे. थेट मतदारांना रेकॉर्ड केलेला कॉल केले जात आहेत. मात्र याचा मतदारांना मनस्ताप होत आहे. निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवाराच्या किंवा त्यांच्या नेत्यांच्या आवाजातील रेकॉर्ड केलेले कॉल मतदारांना येत आहेत. नेत्यांचा कॉल संपताच संबंधित व्यक्तीच्या व्हॉट्सॲपवरही मेसेज येत आहेत. या निवडणुकीत उमेदवारांनी हायटेक प्रचाराच्या मुद्यामध्ये सोशल मीडियाचा सर्वाधिक वापर सुरू केला आहे. त्याचबरोबर हा मेसेजचा पॅकही नेत्यांनी घेतला आहे.

## अश्विनी एकबोटे

### नाट्य-सिने अभिनेत्री आणि नृत्यांगना

**अश्विनी एकबोटे या माहेरच्या अश्विनी काटकर, त्यांनी बालपणी नंदनवन या नाटकात काम केले होते. पुण्यातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातून बी. कॉम पदवी संपादन करीत असताना पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतून त्यांनी अभिनय केला होता. त्यांनी नृत्य हा विषय घेऊन एम.ए केले होते.**

उच्चशिक्षण घेतल्यानंतर त्या अभिनय आणि नृत्यक्षेत्राकडे वळल्या. अभिनयाबरोबरच त्या शास्त्रीय नृत्यही शिकल्या होत्या. त्या पुण्यातील कलावर्धिनी नृत्यसंस्थेच्या कोथरूड शाखेच्या प्रमुख होत्या. देबू, महागुरू, बावरे प्रेम हे, तप्तपदी, डंक्यावर डंका, आरंभ, क्षण हा मोहाचा, कॉफी आणि बरंच काही अशा मराठी चित्रपटांसह 'एक पल प्यार का' या हिंदी सिनेमातूनही त्यांनी भूमिका केली होती.





त्या तिघांची गोष्ट, एका क्षणात, नांदी ही गाजलेली नाटके त्यांनी रंगमंचावर साकारली. दुहेरी, दुर्वा, राधा ही बावरी, तू भेटशी नव्याने, अहिल्याबाई होळकर या मालिकांमधून त्या घराघरात पोहोचल्या होत्या. 'गणपती बाप्पा मोरया' या मालिकेमध्ये त्या रावणाच्या आईची, कैकयीची भूमिका करत होत्या. अरुंधती, उंच माझा झोका, असंभव या मालिकांमधील त्यांच्या भूमिकाही गाजल्या होत्या.

अश्विनी एकबोटे यांनी झी २४ तासच्या 'अनन्य सन्मान' या कार्यक्रमात खास अँकरिंग केले होते. अश्विनी यांचे पती प्रमोद एकबोटे पुणे फायर ब्रिगेडमध्ये वायरलेस डिपार्टमेंटचे सीनियर रेडिओ टेक्निशियन आहेत तर मुलगा शुभांकर एकबोटे अभिनयात करिअर करीत आहे. अश्विनी एकबोटे यांचे २२ ऑक्टोबर २०१६ रोजी सहज संस्थेतर्फे 'नाट्य त्रिविधा' या कार्यक्रमाचा पुण्यातील भरत नाट्य मंदिर येथे सायंकाळी शुभारंभाचा प्रयोग होता. या कार्यक्रमात अश्विनी एकबोटे यांनी काही गीतांवर नृत्य सादर केले होते. शेवटी त्या 'संगीत बावनखणी' नाटकाच्या भैरवीवर नृत्य करण्यासाठी रंगमंचावर आल्या. प्रसिद्ध गायिका रेवा नातू आणि चिन्मय जोगळेकर यांनी नाट्यगीत सादर केले. त्यावर नृत्य करीत असताना तिहाई घेतल्यावर अश्विनी रंगमंचावर कोसळल्या. त्यांना तातडीने पेरुगेटजवळील एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. उपचार सुरू असतानाच नऊच्या सुमारास त्यांचे निधन झाले.



## फडणवीसांचे १६ शिलेदार शिंदे-अजित पवारांच्या गोटात

■ मुंबई

**यंदाच्या** विधानसभा निवडणुकीत महायुती आणि आघाडी दोन्हीकडे तीन प्रमुख पक्ष असल्याने तिकीट वाटपावरून रस्सीखेच झाली. तिकीट नाकारलेल्या अनेकांनी बंडखोरी केली आहे. भाजपामधील तब्बल १६ नेते शिवसेनेच्या शिंदे गटात तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात सहभागी होऊन निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

यामध्ये संजय काका पाटील, प्रताप पाटील चिखलीकर, राजकुमार बडोले, निशिकांत पाटील या भाजपामधून आलेल्यांना अजित पवारांनी तिकीट दिले आहे. तर निवडणुकीपूर्वी शिवसेनेत प्रवेश केलेल्या भाजपाचे १२ दिग्गज नेते शिंदेंच्या शिवसेनेकडून विधानसभा लढत आहेत.

या १२ भाजपा नेत्यांमध्ये संजना जाधव (कन्नड विधानसभा मतदारसंघ), नीलेश राणे (कुडाळ-मालवण मतदारसंघ), राजेंद्र गावित (पालघर), संतोष शेट्टी (भिवंडी पूर्व), मुरजी पटेल (अंधेरी पूर्व), अजित पिंगळे (धाराशिव), दिग्विजय बागल (करमाळा), विठ्ठल लंघे (नेवासा), बळीराम शिरसकर (बाळापूर), विलास तरे (बोईसर), अमोल खताळ (संगमनेर) आणि शायना एनसी (मुंबादेवी) यांचा समावेश आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत बंडोबा थंड न झाल्याने सर्वपक्षीय नेत्यांचे टेन्शन वाढले आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होत असताना काही ठिकाणी 'मैत्रीपूर्ण लढत'होईल, असे सध्याचे चित्र आहे.

## दिवाळीच्या पहिल्या दिवशीच देवगडात ढगफुटीसदृश पाऊस

■ देवगड

**काल** दीपावलीच्या पहिल्याच दिवशी देवगड तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस पडला. अचानक पाऊस सुरू झाल्याने लोकांची तारांबळ उडाली. संध्याकाळी पाच वाजल्यापासून पावसाने जोरदार सुरुवात केल्याने अनेक भागांत वीज गायब झाली होती. दिवाळीचा पहिलाच दिवस असल्यामुळे बाजारपेठांमध्ये विविध वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी गर्दी केली होती; मात्र मेघगर्जनासह अचानक सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दिवाळीच्या तोंडावर गुलाबी थंडीची चाहूल लागते. मात्र गेल्या काही वर्षांत पर्यावरणीय समतोल ढासळल्याने नैसर्गिक आपत्तीत वाढ झाली आहे.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सौजन्य आणि नम्रता सांगणारी बलिप्रतिपदा

नित्याने परंतु निमित्ताने ज्या गोष्टी केल्या जातात त्या परंपरा या व्याख्येमध्ये समाविष्ट होतात. भारतीय संस्कृतीने या सृष्टीतली जी काही सत्य तत्त्वे आहेत त्याला नित्य मानले आणि त्याचे सतत स्मरण राहावे म्हणून काही उपक्रमही सुरू केले. पाच दिवसांच्या दीपोत्सवाचा विचार केला तर हा दीपोत्सवही दरवर्षी नित्याने येणारा उत्सव असतो. पण या पाच दिवसांत वेगवेगळ्या निमित्ताने केले जाणारे स्मरण म्हणजे या सृष्टीच्या किंवा निसर्गाच्या तत्त्वांना मनुष्याच्या मनामध्ये जागवण्याचा प्रयत्न होतो. वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजनानंतरचा आजचा हा बलिप्रतिपदेचा म्हणजेच पाडव्याचा दिवस प्राचीन काळात होऊन गेलेल्या बळीराजाच्या स्मरणार्थ असतोच. शिवाय विक्रम संवत्सराचा पहिला दिवस आणि घरातील किंवा कुटुंबातील वडिलधाऱ्या व्यक्तींविषयी आदर कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता या दिवसाची योजना केली गेली. आणि ती आज हजारो वर्षांनंतरही टिकून राहिली. कोणत्याही प्रकारचा व्यवहार करताना किंवा आनंद, उत्सव साजरा करतानासुद्धा अहंकार, गर्व, अभिमान असता कामा नये. याच दृष्टीकोनातून बळीराजाच्या कथेचा संदर्भ खूप महत्त्वाचा ठरतो. स्वतःला दानशूर समजणाऱ्या बळी राजाला आपल्या दानाचाही अहंकार झाला होता. तो कमी करण्यासाठी विष्णूने वामनाचा अवतार घेऊन त्याच्याकडे तीन पावलं भूमीची मागणी केली. वामनाच्या दोन पावलातच सगळी भूमी व्यापली गेली. आणि आता तिसरे पाऊल कुठे ठेवू अशी विचारणा भगवान वामनाने बळीकडे केली. तेव्हा त्याने विनम्र होऊन आपल्या मस्तकावर परमेश्वराने पाय ठेवावा अशी विनंती केली. याचा अर्थ हे संपूर्ण ब्रह्मांड एका ईश्वरी शक्तीची निर्मिती आहे. त्यातल्या कोणत्याही गोष्टीवर व्यक्तीने स्वतःचा अधिकार किंवा त्याच्या विषयीच्या दानातून अभिमान, अहंकार बाळगता कामा नये. ही परमेश्वराचीच वस्तू मानून परमेश्वरालाच अर्पण करण्याची सतत जाणीव ठेवली पाहिजे. ज्याला त्वमेव वस्तू तुभ्यं अर्पमेव। असे म्हटलेले आहे. हीच कृतज्ञतेच आणि निरहंकारी वृत्ती टिकून राहावी किंवा त्याची सतत जाणीव राहावी असा विचार यातून मांडला गेला. दरवर्षी नित्याने त्याची आठवण करून दिली जाते.

**नित्य आणि निमित्ताचे महत्त्व**

दीपोत्सवाच्या एका विशिष्ट पर्वामध्ये येणारी ही सगळी निमित्त संस्कृतीच्या पंचामृतासारखी आहेत. ज्यामधून व्यक्ती आणि समाजाला एकूणच जीवन जगण्याविषयीचा नवा दृष्टीकोन मिळत असतो. आणि या नित्यनैमित्तिक सणउत्सवातून आत्मविश्वासही वाढीला लागत असतो. म्हणूनच दरवर्षी त्याच पद्धतीचे सणवार येऊनही ते तितक्याच उत्साहाने साजरे होत असतात. या उत्साहाला एकत्र आणणारा किंवा बांधून ठेवणारा त्यामागचा विचार महत्त्वाचा ठरतो. आज निदान महाराष्ट्राच्या घराघरात या पाडव्याच्या मुहूर्तावर एकमेकांविषयीचा आदर व्यक्त होईल, कृतज्ञताही त्यातून दाखवली जाईल. एकमेकांना शुभेच्छा देत असताना आशीर्वाद आणि भेटवस्तूंच्या माध्यमातून त्यातला आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न होतो. प्रतिपदा ही तिथी तर दर महिन्याला येतच असते. परंतु एखाद्या नव्या संकल्पाचा प्रारंभ करायचा असेल तर चैत्रपाडवा किंवा दीपोत्सवातली ही बलिप्रतिपदा महत्त्वाची मानली गेली. कारण मनामधल्या संकल्पांना किंवा विचारांना पोषक वातावरण किंवा पर्यावरण लाभणं हेदेखील आवश्यक असतं. विचार किंवा संस्कारांचे हे बीज अशा पोषक वातावरणामुळे अधिक चांगल्या पद्धतीने अंकुरले जाते. म्हणजेच अपेक्षित असलेले फळही त्यातून मिळण्याची शक्यता असते. दीपोत्सवातला हा लक्ष्मीपूजन किंवा पाडव्याचा दिवस सणवार म्हणून लक्षात ठेवला जातो. परंतु या निमित्ताला माध्यम म्हणून बरेच काही सार्थ करण्याची किमया घडून येते. विशेषतः भारतीय समाजव्यवस्थेच्या भक्कमतेचे गमक हे या दीपोत्सव किंवा पाडव्यासारख्या सण उत्सवात सापडते. काळ वेगाने बदलत असतो. काही नव्या समजुती आणि चालीरीतीसुद्धा समाजाकडून स्वीकारल्या जात असतात. परिस्थितीचा रेटा, अनेक अडीअडचणी आणि त्यातून दुरावत जाणारे नातेसंबंध किंवा समाजातले अनुबंधसुद्धा काहीवेळा विचार करायला लावतात. परंतु एकूणच जीवनाचा आनंद आणि एकमेकांच्या सहकार्यातून निर्माण होणारा सौजन्यभाव हा इतर भौतिक साधनसंपत्तीपेक्षा खूपच मोलाचा ठरत असतो. म्हणजेच ज्याचे मूल्यमापन पैशात किंवा अन्य कुठल्याही स्वरूपात करता येत नाही.

**अन्यथा कालचक्रात नष्ट झाले असते**

तसे पाहिले तर हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेला वामनअवतार आणि त्याने दूर केलेला बळीराजाचा अहंकार या गोष्टी काळाच्या गर्तेमध्येसुद्धा गडप किंवा लुप्त होऊ शकल्या असत्या. परंतु त्या आजही टिकून आहेत. कारण वामनअवतार किंवा बळीराजाला शिकवला गेलेला धडा ही काही केवळ एक घटना किंवा प्रसंग ठरत नाही. तर यातून नित्य स्वरूपाचा आणि खूप मोठे सत्य सांगणारा विचार मांडला गेला. आणि तो भारतीय समाजव्यवस्थेला मोठा आधारही वाटला. प्रामुख्याने एकमेकांविषयीची आदराची भावना हीदेखील गर्व आणि अहंकार न ठेवता टिकवून ठेवायची म्हणजे सगळ्यांचीच एक मोठी कसोटी ठरते. आजकाल तर पुस्तकी ज्ञानाने आणि पैसा संपत्तीने मानसन्मानाचा खूप पगडा आहे. अपमान सहन करणे कोणालाही शक्य नसते. परंतु केवळ स्वतःमधल्या अनावश्यक गर्वातून हा अहंकार निर्माण होतो. त्याचा परिणाम हा अंतिमतः नुकसानकारकच असतो. तो धोका लक्षात राहावा आणि दैनंदिन व्यवहारांमधूनसुद्धा मनुष्याच्या जगण्यामध्ये सहजता यावी. ही सहजता नम्रतेतून आणि एकमेकांविषयीच्या सौजन्यतेतूनच टिकून राहू शकते. बलिप्रतिपदा हा नम्रता आणि सौजन्यतेचा आविष्कारच ठरतो. हा विचार संस्काररूपाने भारतीय समाजाच्या मनावर इतका विलक्षण पद्धतीने कोरला गेला आहे की, तो नाहीसा होणे शक्य नाही. कदाचित त्याचे स्वरूप थोडेफार बदलू शकेल. परंतु एकमेकांमधल्या सौजन्यतेचा गोडवा टिकवून ठेवण्याचे काम दीपोत्सवासारख्या पाडव्यातून अखंडपणे होत आले आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जगातील सर्वात सुंदर वृक्ष म्हणजे विश्वास.कारण तो जमिनीवर नाही तर मनात उगवतो.

## पंचांग

**शनिवार, २ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**




**कार्तिक शुक्ल प्रतिपदा**
**नक्षत्र : विशाखा**
**-: जन्मराशी :-**
००-०१ ते २३-२२ तूळ
२३-२३ ते २४-०० वृश्चिक

**रवी उदय- ०६-४१**
**रवी अस्त- १८-०४**

**कार्तिक मासारंभ, बलिप्रतिपदा, अभ्यंगस्नान, विक्रमसंवत २०८१ अनलनाम संवत्सरारंभ महावीर जैन संवत २५५१, अन्नकूट, गोवर्धन पूजा, औद्योगिक सुरक्षा दिन**

## पाककृती

### बालूशाही



★ **साहित्य -** १ कप मैदा, १/२ चमचा खाण्याचा सोडा, २ चमचे तूप, ३ चमचे दही, १ कप साखरेचा अर्धा कप पाक, ४ कप तूप, मीठ.

★ **कृती -** सर्वप्रथम साखरेत, साखर भिजेल इतके पाणी घालून ते पाक तयार करून घ्या. त्यानंतर मैद्यात मीठ, तूप आणि दही घालून मिक्स करून त्याचा गोळा तयार करा. हे पीठ मळताना पाणी लागल्यास केवळ एक चमचा पाणी वापरा. आता २०-३० मिनिटांसाठी पीठ झाकून ठेवा. त्यानंतर कढईत तूप घालून मंद गॅसवर तापायला ठेवा. आता मुरलेल्या गोळ्यातून पेढ्याच्या आकाराच्या बालूशाही तयार करा. बालूशाहीचा आकार देताना त्यामध्ये अंगठ्याने दाब द्या आणि हे गरम तुपात घालून मंद आचेवर तळून घ्या. लालसर रंग येईपर्यंत या बालूशाही तळून त्या थंड करायला ठेवा. या थंड झालेल्या बालूशाही साखरेच्या पाकात किमान एक तास तरी ठेवा, त्यानंतर या पाकातून बाहेर काढून त्याचा आस्वाद घ्या.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे**
(*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



# जडेजा, सुंदरने न्यूझीलंडला २३५ धावांत गुंडाळले
# तिसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजांची कसोटी

**भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात तिसरा आणि अंतिम सामना मुंबईत सुरू आहे. या सामन्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय फिरकी गोलंदाज वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनी भेदक मारा करून न्यूझीलंडचा पहिला डाव २३५ धावांमध्ये गुंडाळला. जडेजाने ५ तर सुंदरने ४ बळी घेतले. आता पहिल्या डावात भारतीय फलंदाजांची कसोटी आहे. कारण गोलंदाजांनी त्यांची कामगिरी चोख बजावून न्यूझीलंडला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. आता फलंदाजांनी पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारून लीड घेतला तरच या सामन्यात भारताला विजयाची संधी मिळू शकते. त्यामुळे क्लीन स्विप टाळता येईल.**



■ मुंबई

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. पण आकाशदीप याने सलामीवीर कॉन्वेला ४ धावांवर पायचीत करून न्यूझीलंडला पहिला धक्का दिला. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने कर्णधार लॅथमचा २८ धावांवर त्रिफळा उडवला. तर राचीन रवींद्रला सुंदरने ५ धावांवर बाद केले. पाठोपाठ जडेजाने यंगला ७१ धावांवर बाद केले. तर मिचेलाला सुंदरने ८२ धावांवर टिपले. यंग आणि मिचेल या दोघांनी अर्धशतके झळकावली नसती तर न्यूझीलंडला १०० धावांचाही टप्पा गाठता आला नसता. कारण तळाचे खेळाडू झटपट बाद झाले.

ब्ल्युन्डेल ०, फिलिप्स १७, सोधी ७, हेनरी ०, पटेल ७ तर ओरौरके नाबाद १ अशा तऱ्हेने न्यूझीलंडचा पहिला डाव ६५.४ षटकात २३५ धावांवर आटोपला. जडेजाने ६५ धावांमध्ये ५ तर वॉशिंग्टन सुंदरने ८१ धावांत ४ बळी घेतले. दरम्यान भारताच्या पहिल्या डावाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. कर्णधार रोहित शर्माला हेनरीने १८ धावांवर बाद करून भारतीय गोटात खळबळ माजवली. त्यानंतर जयस्वाल ३० धावांवर बाद झाला.

नाईट वॉचमन आलेला सिराज ० वर परतला. तर विराट कोहली ४ धावांवर धावचित झाला. पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या ४ बाद ८६ धावा झाल्या होत्या. शुभमन गिल ३१ आणि पंत १ धावेवर नाबाद आहेत.

## वृषभ पंतला चेन्नई सुपर किंगमध्ये आणण्यासाठी धोनीची फिल्डिंग

■ नवी दिल्ली

पुढील वर्षीच्या आयपीएल हंगामासाठी सर्वच फ्रँचाईजीनी आपापल्या रिटर्न आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत याला दिल्ली कॅपिटल संघाने रिलीज केले आहे. त्यामुळे ऋषभला चेन्नई सुपर किंग संघात आणण्यासाठी सध्या धोनीने फिल्डिंग लावली आहे. वृषभ पंत हा मॅच विनर खेळाडू आहे. एक उत्कृष्ट यष्टीरक्षक तसेच आक्रमक फलंदाज अशी ऋषभ पंथची ओळख आहे. त्याने भारतीय संघात तिन्ही फॉरमॅटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. परंतु दिल्ली कॅपिटल संघात त्याचे प्रशिक्षकांबरोबर मतभेद होते. त्यामुळे त्यांनी दिल्ली कॅपिटल संघ सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पुढील हंगामासाठी दिल्ली कॅपिटलने त्याला रिलीज केले आहे. त्यामुळे ऋषभ पंत आता लिलावामध्ये भाग घेऊ शकतो. ऋषभ पंतसाठी अनेक फ्रँचाईजी प्रयत्न करणार आहेत.

## द. आफ्रिकेकडून बांगलादेशचा एक डाव २७३ धावांनी पराभव

■ ढाका

बांगलादेश आणि द. आफ्रिका यांच्यात खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी द. आफ्रिकेने बांगलादेशचा एक डाव आणि २७३ धावांनी पराभव केला. यासह आफ्रिका संघाने मालिका २-० ने जिंकली. बांगलादेशच्या संघाने ३८ धावांवर ४ विकेट्स घेऊन खेळण्यास सुरुवात केली आणि संपूर्ण संघ १५९ धावांवर ऑलआऊट झाला. मोमिनुलने सर्वाधिक ८२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडाने पहिल्या डावात ५ बळी घेतले. डेन पीटरसन आणि केशव महाराज यांनी २-२ विकेट घेतल्या. सेनुरान मुथुसामी यांनाही यश मिळाले. बांगलादेशला फॉलोऑन स्कोअरही पार करता आला नाही. अशा स्थितीत आफ्रिकेने त्याला पुन्हा फलंदाजीसाठी बोलावले. बांगलादेशचा दुसरा डाव अवघ्या १४३ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेकडून दुसऱ्या डावात केशव महाराजने ५ बळी घेतले. त्याच्याशिवाय सेनुरान मुथुसामीने ४ बळी घेतले.

## कर्णधार ऋतुराज दुसऱ्या डावातही फ्लॉप

■ मेलबर्न



टीम इंडिया ए ऋतुराज गायकवाड याच्या नेतृत्वात पहिला अनधिकृत कसोटी सामना खेळत आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाला पहिल्या डावात १०७ धावांवर ऑलआऊट करून प्रत्युत्तरात १९५ धावा करत ९५ धावांची निर्णायक आघाडी घेतली. टीम इंडियाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड दुसऱ्या डावातही अपयशी ठरला. ऋतुराजला पहिल्या डावात तर भोपळाही फोडता आला नाही. फर्गस ओ नील याने ऋतुराज गायकवाड याला कॅमेरॉन बॅनक्रॉफ्ट याच्या हाती ५ धावांवर कॅच आऊट करत ऑस्ट्रेलियाला पहिली विकेट मिळवून दिली. त्यानंतर अभिमन्यू ईश्वरने १२ धावांवर बाद झाला. त्यानंतर साई सुदर्शन आणि देवदत्त पडीक्कल या दोघांनी नाबाद शतकी भागीदारी करत टीम इंडियाचा डाव सावरला. या दोघांनी केलेल्या नाबाद अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारताने २ विकेट्स गमावून ४३ षटकांमध्ये १४६ धावा केल्या आहेत. भारता ए संघाने यासह ५८ धावांची आघाडी घेतली आहे. तर साई सुदर्शन १२२ बॉलमध्ये ६२ धावांवर नॉटआऊट आहे. तर देवदत्त पडीक्कल याने नाबाद ५५ धावा केल्या आहेत.

## सहा षटकांच्या सामन्यामध्ये पाकिस्तानचा भारतावर विजय

■ हाँगकाँग

सध्या सुरू असलेल्या हाँगकाँग क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानी भारताचा पराभव केला आहे. सहा षटकांच्या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ११९ धावा केल्या होत्या परत चिपली याने सर्वाधिक ५३ धावा केल्या तर रॉबिन उत्तप्पणे ३१ धावा केल्या .केदार जाधव केवळ आठ धावा करू शकला. मनोज तिवारीने१७ धावा केल्या .दरम्यान या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी संघाने भारताचा सहा गडी राखून पराभव केला. पाकिस्तानच्या आसिफ अलीने १४ चेंडूत सात षटकार आणि दोन चौकारांच्या सहाय्याने ५५ धावा केल्या.

## केकेआर संघाच्या मॅनेजमेंटमुळे शाहरुखला १२ कोटींचा फटका

■ नवी दिल्ली

केकेआर मॅनेजमेंटने मॅचविनर खेळाडूंना संघात ठेवून चांगली कामगिरी केलीय. पण, एका चुकीमुळे शाहरुख खानला १२ कोटींचा फटका बसला. केकेआरने रिटेन केलेल्या खेळाडूंच्या एकूण रकमेची बेरीज केली तर (१३+१२+१२+१२+४+४) म्हणजेच ५७ कोटी होते. त्यामुळे आयपीएल मेगा ऑक्शनसाठी जाताना त्यांच्या खात्यामध्ये एकूण १२० कोटी बजेटमधील ५७ कोटी वजा केले तर ६३ कोटी शिल्लक हवेत. पण, त्यांना प्रत्यक्षात ५१ कोटी रुपये खर्च करायला मिळणार आहेत. कोणत्याही फ्रँचायझीला ही निश्चित करण्यात आलेली रक्कम आणि प्रत्यक्ष खेळाडूंना देण्यात येणारी रक्कम यामध्ये बदल करण्याचा अधिकार होता. केकेआरने रिटेन केलेल्या खेळाडूंमध्ये चार आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि दोन आंतरराष्ट्रीय क्रिकेट न खेळलेले भारतीय खेळाडू आहेत.

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील भारताचा १ सामना रद्द

■ सिडनी



भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका संपल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या दौऱ्यासाठी रवाना होईल. ही मालिका २२ नोव्हेंबरपासून पर्थच्या मैदानावर खेळवली जाणार आहे. यादरम्यान भारतीय संघाने एक सामना रद्द केल्याची माहिती समोर आली आहे. ऑस्ट्रेलियाला पोहोचल्यानंतर, भारतीय संघाला पर्थमधील डब्ल्यू सीएए मैदानावर १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान इंट्रा स्क्वॉड सामना खेळायचा होता. ज्यामध्ये त्यांचा सामना ऋतुराज गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाला पोहोचलेल्या भारत ‘अ’ संघाशी होणार होता. मात्र, आता यात बदल करण्यात आला असून, इंट्रा स्क्वॉड मॅच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## प्रो कबड्डी लीग! यु मुम्बाचा जयपूर पँथर्सवर विजय

■ हैदराबाद

प्रो कबड्डी लीगच्या ११व्या हंगामातील एका महत्त्वाच्या सामन्यात यु मुम्बाने सर्वोत्तम सांघिक खेळाचे प्रदर्शन करून जयपूर पिंक पँथर्सवर ३९-२७ असा दोन गुणांनी विजय मिळविला. प्रमुख चढाईपटूंच्या अपयशात यु मुम्बाकडून अजित चव्हाणच्या (१४ गुण) आणि जयपूरकडून नीरज नरवालच्या (१२ गुण) चढायांचा खेळ लक्षवेधक ठरला.

यानंतरही पूर्वार्धात यु मुम्बाने चढवलेला लोण आणि त्यांना मिळालेले अतिरिक्त २ गुण निर्णायक ठरले. मागील



सामना बरोबरीत खेळल्यानंतर दोन्ही संघ विजयासाठी या सामन्यात उतरले.

आज यू मुंबा वेगळी योजना आखून अजित चव्हाणला सातत्याने रेड टाकायला पाठवत होते. अजित जबरदस्त फॉर्ममध्ये होता आणि त्यामुळे यू मुंबा पहिली पाच मिनिटे एका गुणाने पुढे होता आणि स्कोअर ४-३ असा होता. जयपूर पिंक पँथर्ससाठी कर्णधार अर्जुन पहिल्या १० मिनिटांत काही खास खेळ दाखवू शकला नाही. पण अंकुश राठी आणि नीरजच्या जोरावर जयपूरने सलग दोन सुपर टॅकल करत ९-८ अशी आघाडी घेतली. असे असतानाही यू मुम्बाने प्रथम स्कोअर ९-९ असा बरोबरीत आणला आणि नंतर आघाडी प्रस्थापित केली. ही आघाडी अखेरपर्यंत टिकून यु मुम्बाने जयपूर पँथर्सवर विजय मिळवला.

# तेजीसाठी 'चीनी कम'

**भारतीय शेअर बाजार गेले काही आठवडे जागतिक पटलावरुन येणार्या संकेतांमुळे सातत्यपूर्ण तेजी दर्शवत वरच्या दिशेने झेपावत आहेत. गतसप्ताहातही हा तेजीचा सिलसिला कायम राहिला. साप्ताहिक परिप्रेक्ष्यातून पाहता निफ्टीमध्ये गतसप्ताहात १.५ टक्क्यांची तेजी दिसून आली; तर सेन्सेक्स १०३० अंकांनी वधारला. सर्व प्रमुख निर्देशांक हिरवा झेंडा फडकावत बंद झाले. यामध्ये धातू क्षेत्र आणि ऑटोमोबाईल क्षेत्राच्या समभागांची कामगिरी दमदार राहिली. या दोन्ही क्षेत्राच्या निर्देशांकात अनुक्रमे ७ टक्के आणि ४.५ टक्के तेजी दिसून आली. गतसप्ताहात निफ्टीने २६ हजारांची आणि सेन्सेक्सने ८५ हजारांची पातळी ओलांडली. सलग सहा सत्रांत ३.३ टक्क्यांच्या तेजीनंतर शुक्रवारी साप्ताहिक समाप्तीच्या दिवशी बाजारात घसरण झाली आणि निफ्टी ३७ अंकांनी घसरून २६१७९ अंकांवर बंद झाला; तर सेन्सेक्स ८५५७२ अंकांवर बंद झाला.**

शुक्रवारच्या दिवशीच्या घसरणीस कारण ठरले ते चीनच्या स्टीम्युलस पॅकेजचे ! कोविडनंतरच्या काळात चीनी अर्थव्यवस्था सातत्याने घसरणीला लागली आहे. तेथील बांधकाम क्षेत्रासह सर्वच क्षेत्रात मंदीचे वातावरण निर्माण झाल्याने चीनचे जागतिक अर्थकारणातील स्थान डळमळीत झाले आहे अशा चर्चाही सुरू झाल्या होत्या. यातून बाहेर पडण्यासाठी चीन सरकारने १४० अब्ज डॉलर इतका प्रचंड पैसा अर्थव्यवस्थेत ओतण्याचा निर्णय घेतला आहे. चीनच्या मध्यवर्ती

प्रभाव यामध्ये महत्त्वाचा राहील. आरबीआयच्या द्वैमासिक पतधोरणात व्याजदर कपात होईल अशी शक्यता वर्तवली जात असली तरी अर्थव्यवस्था सध्या वेगाने धावत असल्याने तशा शक्यता कमी दिसताहेत. दुसरीकडे, तिमाही निकालांचा काळ आता सुरू होणार असल्याने त्याचा परिणाम बाजारावर जाणवेल. नवरात्रोत्सवापासून सणासुदीचे नवे पर्व सुरू होत आहे. या सर्वांचा विचार करता चालू आठवडा बाजारात चढउतार राहण्याची शक्यता

दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी काही काळ संयम ठेवणे हिताचे ठरेल.

भारतीय शेअर बाजार गेले काही आठवडे जागतिक पटलावरुन येणार्या संकेतांमुळे सातत्यपूर्ण तेजी दर्शवत वरच्या दिशेने झेपावत आहेत. गतसप्ताहातही हा तेजीचा सिलसिला कायम राहिला. साप्ताहिक परिप्रेक्ष्यातून पाहता निफ्टीमध्ये गतसप्ताहात १.५ टक्क्यांची तेजी दिसून आली; तर सेन्सेक्स १०३० अंकांनी वधारला. सर्व प्रमुख निर्देशांक हिरवा झेंडा फडकावत बंद झाले. यामध्ये धातू क्षेत्र आणि ऑटोमोबाईल क्षेत्राच्या समभागांची कामगिरी दमदार राहिली. या दोन्ही क्षेत्राच्या निर्देशांकात अनुक्रमे ७ टक्के आणि ४.५ टक्के तेजी दिसून आली. गतसप्ताहात निफ्टीने २६ हजारांची आणि सेन्सेक्सने ८५ हजारांची पातळी ओलांडली. सलग सहा सत्रांत ३.३ टक्क्यांच्या तेजीनंतर शुक्रवारी साप्ताहिक समाप्तीच्या

आर्थिक पॅकेजची घोषणा झाल्याने तेथील शेअर बाजारात गत १६ वर्षांतील सर्वात मोठी वाढ दिसून आली. हाँगकाँगचे बाजारातही १९९८ नंतर पहिल्यांदाच इतकी मोठी तेजी दिसून आली. बाजार अभ्यासकांच्या मते, चीनच्या या पॅकेजचा भारतीय बाजारावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. विशेषतः भारतात एफपीआयच्या माध्यमातून होणारी गुंतवणूक यामुळे चीनकडे वळू शकते. बाजारातील आघाडीच्या ४५ फंडांपैकी ८० टक्के फंडांची चीनबाबतच भूमिका आतापर्यंत अंडरवेट किंवा नकारात्मक होती. ताज्या घडामोडीनंतर ती बदलल्यास भारतीय बाजारात नकारात्मक पडसाद उमटू शकतात. सततच्या तेजीमुळे भारतीय शेअर बाजारातील समभाग महागड्या स्थितीत पोहोचले आहेत. याउलट चीनमधील समभाग तुलनेने निम्म्या किमतीत उपलब्ध आहेत. चीनच्या ताज्या निर्णयानंतर धातू व खनिजांची मागणी पुन्हा वाढेल या अपेक्षने गतशुक्रवारी बीएसई मेटल इंडेक्स १.२ टक्क्यांनी वधारला. त्यामुळे येणार्या काळात भारतीय बाजाराबाबत काहीशी सावध भूमिका घेणे हिताचे ठरेल असे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

अर्थात, शेअर बाजाराची दिशा ठरवण्यास अन्यही घटक कारणीभूत राहतील. अमेरिकेतील तेजीचा प्रभाव यामध्ये महत्त्वाचा राहील. आरबीआयच्या द्वैमासिक पतधोरणात व्याजदर कपात होईल अशी शक्यता वर्तवली जात असली तरी अर्थव्यवस्था सध्या वेगाने धावत असल्याने तशा शक्यता कमी दिसताहेत. दुसरीकडे, तिमाही निकालांचा काळ आता सुरू होणार असल्याने त्याचा परिणाम बाजारावर जाणवेल. नवरात्रोत्सवापासून सणासुदीचे नवे पर्व सुरू होत आहे. या सर्वांचा विचार करता चालू आठवडा बाजारात चढउतार राहण्याची शक्यता दिसते. या चढउतारांना वेग देण्याचे काम सोमवारी फ्युचर आणि ऑप्शन ट्रेडिंगबाबत होणारी सेबीची बैठक करु शकते. या बैठकीत डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगबाबत कठोर निर्णय घेतले गेल्यास बाजारात घसरण दिसू शकते.

टेक्निकल चार्टवर तूर्त निफ्टीसाठी २६ हजारांच्या पातळीवर भक्कम आधार आहे. त्याखाली घसरल्यास २५८०० ते २५५०० पर्यंत घसरण दिसू शकते. बँक निफ्टीसाठी ५४ हजारांवर स्थिरावल्यास ५४५०० पर्यंत झेपावू शकतो; तर खालील बाजूस ५३५०० च्या पातळीवर भक्कम आधार असून त्याखाली घसरल्यास ५३००० पर्यंत घसरू शकतो. सध्याची एकंदर स्थिती पाहता सेल ऑन राईज ही रणनीती उपयुक्त ठरेल.

जागतिक पटलावर आणि देशांतर्गत पातळीवर घडणार्या घडामोडींचा वेध घेतला असता चालू आठवड्यात टोकाचे चढउतार दिसू शकतात. अशा स्थितीत वरच्या स्तरावर नफावसुली करणे हिताचे ठरणार आहे. ट्रेडर्स मंडळींनी सेबीच्या निर्णयांकडे लक्ष ठेवून राहणे गरजेचे आहे. मध्यमकालीन अथवा दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी काही काळ संयम ठेवणे हिताचे ठरेल.

बँकेने अलीकडेच महामारीनंतरच्या काळातील सर्वात मोठी व्याजदर कपात केली आहे. १ ऑक्टोबर रोजी नव्या चीनच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत आणि त्यानिमित्ताने चीनमधील झिनपिंग सरकार तेथील नागरिकांना वन टाईम अलाऊन्स म्हणून मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णय जाहीर करणार आहे. २००८ च्या आर्थिक मंदीनंतर चीनकडून पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आर्थिक पॅकेजची घोषणा झाल्याने तेथील शेअर बाजारात गत १६ वर्षांतील सर्वात मोठी वाढ दिसून आली. हाँगकाँगचे बाजारातही १९९८ नंतर पहिल्यांदाच इतकी मोठी तेजी दिसून आली. बाजार अभ्यासकांच्या मते, चीनच्या या पॅकेजचा भारतीय बाजारावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. विशेषतः भारतात एफपीआयच्या माध्यमातून होणारी गुंतवणूक यामुळे चीनकडे वळू शकते. बाजारातील आघाडीच्या ४५ फंडांपैकी ८० टक्के फंडांची चीनबाबतच भूमिका आतापर्यंत अंडरवेट किंवा नकारात्मक होती. ताज्या घडामोडीनंतर ती बदलल्यास भारतीय बाजारात नकारात्मक पडसाद उमटू शकतात. सततच्या तेजीमुळे भारतीय शेअर बाजारातील समभाग महागड्या स्थितीत पोहोचले आहेत. याउलट चीनमधील समभाग तुलनेने निम्म्या किमतीत उपलब्ध आहेत. चीनच्या ताज्या निर्णयानंतर धातू व खनिजांची मागणी पुन्हा वाढेल या अपेक्षने गतशुक्रवारी बीएसई मेटल इंडेक्स १.२ टक्क्यांनी वधारला. त्यामुळे येणार्या काळात भारतीय बाजाराबाबत काहीशी सावध भूमिका घेणे हिताचे ठरेल असे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

अर्थात, शेअर बाजाराची दिशा ठरवण्यास अन्यही घटक कारणीभूत राहतील. अमेरिकेतील तेजीचा



दिसते. या चढउतारांना वेग देण्याचे काम सोमवारी फ्युचर आणि ऑप्शन ट्रेडिंगबाबत होणारी सेबीची बैठक करु शकते. या बैठकीत डेरिव्हेटिव्ह ट्रेडिंगबाबत कठोर निर्णय घेतले गेल्यास बाजारात घसरण दिसू शकते.

टेक्निकल चार्टवर तूर्त निफ्टीसाठी २६ हजारांच्या पातळीवर भक्कम आधार आहे. त्याखाली घसरल्यास २५८०० ते २५५०० पर्यंत घसरण दिसू शकते. बँक निफ्टीसाठी ५४ हजारांवर स्थिरावल्यास ५४५०० पर्यंत झेपावू शकतो; तर खालील बाजूस ५३५०० च्या पातळीवर भक्कम आधार असून त्याखाली घसरल्यास ५३००० पर्यंत घसरू शकतो. सध्याची एकंदर स्थिती पाहता सेल ऑन राईज ही रणनीती उपयुक्त ठरेल.

जागतिक पटलावर आणि देशांतर्गत पातळीवर घडणार्या घडामोडींचा वेध घेतला असता चालू आठवड्यात टोकाचे चढउतार दिसू शकतात. अशा स्थितीत वरच्या स्तरावर नफावसुली करणे हिताचे ठरणार आहे. ट्रेडर्स मंडळींनी सेबीच्या निर्णयांकडे लक्ष ठेवून राहणे गरजेचे आहे. मध्यमकालीन अथवा

**Mahamoney.com**

दिवशी बाजारात घसरण झाली आणि निफ्टी ३७ अंकांनी घसरून २६१७९ अंकांवर बंद झाला; तर सेन्सेक्स ८५५७२ अंकांवर बंद झाला.

शुक्रवारच्या दिवशीच्या घसरणीस कारण ठरले ते चीनच्या स्टीम्युलस पॅकेजचे ! कोविडनंतरच्या काळात चीनी अर्थव्यवस्था सातत्याने घसरणीला लागली आहे. तेथील बांधकाम क्षेत्रासह सर्वच क्षेत्रात मंदीचे वातावरण निर्माण झाल्याने चीनचे जागतिक अर्थकारणातील स्थान डळमळीत झाले आहे अशा चर्चाही सुरू झाल्या होत्या. यातून बाहेर पडण्यासाठी चीन सरकारने १४० अब्ज डॉलर इतका प्रचंड पैसा अर्थव्यवस्थेत ओतण्याचा निर्णय घेतला आहे. चीनच्या मध्यवर्ती बँकेने अलीकडेच महामारीनंतरच्या काळातील सर्वात मोठी व्याजदर कपात केली आहे. १ ऑक्टोबर रोजी नव्या चीनच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत आणि त्यानिमित्ताने चीनमधील झिनपिंग सरकार तेथील नागरिकांना वन टाईम अलाऊन्स म्हणून मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णय जाहीर करणार आहे. २००८ च्या आर्थिक मंदीनंतर चीनकडून पहिल्यांदाच इतक्या मोठ्या

# कर्नाटकात पुरुषांपेक्षा महिला मतदार अधिक

■ बेळगाव

**विधानसभा** व लोकसभेत महिलांना ५० टक्के वाटा मिळेल तेव्हा मिळेल; पण मतदान प्रक्रियेत कर्नाटकातील महिलांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कारण कर्नाटक राज्यात आता महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक झाली आहे. राज्याच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडले आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या मतदार यादीनुसार ही आकडेवारी पुढे आली आहे.



निवडणूक विभागाच्या प्राथमिक आकडेवारीनुसार राज्यातील २२१ विधानसभा मतदारसंघातील महिला मतदारांची संख्या २.७२ कोटींवर पोहोचली आहे. तर पुरुष मतदारांची संख्या २.७१ कोटी आहे. ५,०२२ मतदार तृतीयपंथी आहेत.चन्नपट्टण, शिग्गाव व सांडूरमध्ये १३ नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होत असल्याने या यादीत वरील तीन मतदारसंघातील मतदारांचा समावेश केलेला नाही. या तीन मतदारसंघांतील मतदार संख्या यादीत समाविष्ट केली तरी महिलांची संख्या पुरुषांपेक्षा ३६,६४२ ने अधिक आहे. सध्या तरी किनारपट्टीसह काही जिल्ह्यांमध्ये महिला मतदारांची संख्या लक्षणीयरित्या अधिक आहे. मतदारांना २८ नोव्हेंबरपर्यंत या यादीवर आक्षेप नोंदवता येणार आहेत. तर अंतिम यादी ६ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. महिलांच्या या वाढलेल्या संख्येला निवडणुकीच्या राजकारणात महत्त्व आले आहे.या संख्येमुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.रोजगारासाठी पुरुषांचे राज्याबाहेर स्थलांतर वाढल्याने हा बदल झाला असावा, असे राजकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# कानपूरमध्ये दिव्यामुळे घराला आग पती-पत्नीसह मोलकरीणीचा मृत्यू

■ कानपूर

**कानपूरमध्ये** दिवाळीच्या दिवशी मंदिरातील दिव्यामुळे घराला भीषण आग लागली. त्यात व्यापारी पती-पत्नीसह मोलकरीणीचा होरपळून मृत्यू झाला. पूजा केल्यानंतर पती-पत्नी मंदिरात दिवा लावून झोपी गेले. संजय श्याम दासानी (४८), पत्नी कनिका दासानी (४२) आणि मोलकरीण छवी चौहान (२४) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. त्यांची अंबाजी फूड्स नावाची बिस्किट कंपनी आहे. आगीमुळे घरातील स्वयंचलित दार लॉक झाले. त्यामुळे पती-पत्नी बेडरूममध्ये अडकले. मुलगा पार्टीवरून परतला तेव्हा त्याला घरातून धूर निघत असल्याचे दिसून आला. त्याने आरडाओरड केल्याने शेजारी धावून आले. याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथकही पोहोचले. आग विझवल्यानंतर घरातून पती, पत्नी आणि मोलकरणीला बाहेर काढून रुग्णालयात नेण्यात आले. मात्र रुग्णालयात डॉक्टरांनी तिघांनाही मृत घोषित केले.

# मुरुडमध्ये भातपिकाची कापणीला सुरुवात

**मुरुड-** मुरूड तालुक्यातील भातशेतीचे पीक पूर्ण तयार झाले असून ठिकठिकाणी भातकापणी आणि बांधणीची लगबग सुरू आहे. यंदा भातपीक उत्तम आले असून, शेतकर्यांना मोठा दिलासा मिळेल असे दिसून येत आहे. प्रामुख्याने 'जया' आणि 'चिंटू' वाणाच्या भात कापणीला शेतकर्यांनी प्रारंभ केला आहे. मुरुड तालुक्यात साधारणपणे पारंपरिक गरवे, निम गरवे, हळवे अशा स्वरुपात भातपिकाची विभागणी केली जाते.

# नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरणी तिघा आरोपींना जामीन

■ मुंबई

**नालासोपारा** शस्त्रसाठा प्रकरणातील तिघा आरोपींना विशेष सत्र न्यायालयाने दिलासा दिला.सत्र न्यायालायाच्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश सी. एस. बाविस्कर यांनी आरोपींनी पुण्यातील सनबर्न फेस्टिव्हल उधळून लावण्याचा कट रचल्याचे निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्याचे स्पष्ट करत आरोपी शरद कळसकर, अमोल काळे आणि ऋषिकेश देवडीकर या तिघांना जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. पुण्यात २६ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत आयोजित केलेल्या सनबर्न फेस्टिवलमध्ये हल्ल्याचा कट रचल्याचा आरोपावरून एटीएसने ऑगस्ट २०१८ मध्ये आरोपी शरद कळसकर, अमोल काळे आणि ऋषिकेश देवडीकर एकूण १४ जणांना अटक केली होती.

अटकेत असलेल्या आरोपी शरद कळसकर, अमोल काळे आणि ऋषिकेश देवडीकर यांनी ऍड. वीरेंद्र इचलकरंजीकर आणि ऍड. प्रकाश साळसिंगीकर यांच्यामार्फत जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर विशेष न्यायालयाचे न्यायाधीश सी. एस. बाविस्कर समोर सुनावणी झाली. आरोपींच्या कोणत्याही कृत्याने देशाची एकता, अखंडता, सुरक्षा आणि सार्वभौमत्वाला कुठल्याही प्रकारे धक्का बसल्याचे दाखवून देणारे पुरावे नाहीत. तसेच अन्य आरोपीचा प्रसिद्ध व्यक्तींच्या हत्या प्रकरणात सहभाग असला तरी त्या स्वतंत्र गुन्ह्याचा व या प्रकरणाचा संबंध जोडू शकत नाही, असे स्पष्ट करत आरोपीना जामीन मंजूर केला.

# मविआला पाठिंबा देण्यासाठी रिपब्लिकन गटांची आघाडी स्थापन

■ मुंबई

**राज्यातील** विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय विविध रिपब्लिकन गटांनी घेतला आहे. त्यासाठी या गटांनी 'रिपब्लिकन एकता आघाडी'ची स्थापना केली आहे. या आघाडीची बैठक साहित्यिक अर्जुन डांगळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आझाद मैदानात झाली.

राज्यातील सत्तेपेक्षा राज्यसभेतील बहुमत भाजपसाठी महत्वाचे आहे. भाजप कायम संविधान बदलण्याचा प्रयत्न करत आहे. विधानसभेला दलितांची मतविभागणी करण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे.त्यामुळे बौद्ध समाजाने राज्यात सत्तांतर घडवण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे, अशी भूमिका या बैठकीत अनेक नेत्यांनी मांडली. मविआतील तीन पक्षांशी संवाद,संपर्क राखण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये दलित पँथरचे सुरेश केदारे,पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रचे मिलिंद सुर्वे, रिपब्लिकन पक्ष- खोब्रागडेचे भाऊ निरभवणे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे सागर संसारे, दलित सेनेचे रवी गरुड,रिपब्लिकन जनशक्तीचे मनोज बागुल, लोक मोर्चाचे प्रकाश हिवाळे, आंबेडकरवादी भारत मिशनचे सतीश डोंगरे यांचा समावेश आहे.

# वक्फ बोर्डाने अख्ख्या गावावर हक्क सांगितला ग्रामस्थांचा मुस्लीम नेत्यांवर दगडफेक

■ हावेरी

**कर्नाटकच्या** हावेरीतील कडकोल गावात रात्री मोठा हिंसाचार झाला. या गावावर वक्फ बोर्डाने दावा केल्याने ग्रामस्थांनी वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांवर आणि मुस्लिम नेत्यांवर दगडफेक केली.

कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील कडककोल गावात बुधवारी रात्री उशिरा वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याचा आदेश जारी करण्यात आल्याने गावात तणाव निर्माण झाला होता. गावातील जमिनी या ग्रामस्थांच्या मालकीच्या असतांना वक्फ बोर्डाने त्यावर आपला दावा केल्याने ग्रामस्थ संतप्त झाले होते. मुस्लीम नेत्यांनी व अधिकाऱ्यांनी वक्फच्या नावावर मालमत्ता नोंदविण्यास मदत केल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी जमीन ताब्यात घेण्यासाठी आलेल्या वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांवर दगडफेक केली. या घटनेत काही जण जखमी झाले आहे. त्यांना दवाखान्यात भरती करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. वक्फ आणि अल्पसंख्याक कल्याण मंत्री बी. झेड जमीर अहमद खान यांनी ३ सप्टेंबर रोजी एक बैठक घेतली ज्यात हावेरी जिल्हा प्रशासनाला कथित अतिक्रमित वक्फ जमीन ग्रामस्थांना रिकाम्या करण्याचे आदेश दिले होते. प्रशासनाने ७ सप्टेंबर रोजी आदेश जारी केल्यानंतर हावेरीतील सावनूर तालुक्यातील कडकोल येथील ग्रामस्थ संतप्त झाले होते.

# सानपाड्यात भरधाव कारने तिघांना उडवले

■ नवी मुंबई

**काल** मध्यरात्री सानपाडा भरधाव कार चालकाने तीन जणांना उडवले. हे तिघे जण रस्त्याच्या कडेला तीन जण बोलत उभे होते. त्याचवेळी अचानक भरधाव वेगाने आलेल्या एका चार चाकी वाहनाने त्या तिघांना उडवले. त्यानंतर त्या चालकाने कारसह पळ काढण्याचा प्रयत्न केला. पण उपस्थित जमावाने ही गाडी अडवली. त्यानंतर चालकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी या प्रकरणी कारवाई करत चालकाला अटक केली असून पुढील कारवाई सुरु केली आहे.

# देवीरम्मा टेकडीवरील मंदिरात चेंगराचेंगरी!अनेकजण जखमी

■ बंगळुरू

**कर्नाटकातील** चिकमंगळूर येथील देवीरम्मा हिल मंदिरात नरक चतुर्दशीनिमित्त दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली. त्यात अनेकजण जखमी झाले. काल देवीरम्मा टेकडीवर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. हे भक्त भगवान बिंदीगा देवीरामाचे दर्शन घेण्यासाठी तेथे पोहोचले होते.त्यावेळी ही चेंगराचेंगरीची घटना घडली.



देवीरम्मा टेकडीवर वसलेले मंदिर नरक चतुर्दशीच्या दिवशीच उघडते. हे अतिशय पवित्र आणि भाविकांच्या श्रद्धेचे मोठे केंद्र आहे. चिक्कमंगळुरू येथील मल्लेनाहल्ली येथील मंदिर जत्रेला सुरुवात झाल्याने संपूर्ण परिसरात भक्तीची लाट निर्माण झाली आहे. अतूट श्रद्धेने आणि समर्पणाने भाविक खडकाळ आणि काटेरी वाटेवरून अनवाणी चालत येतात. समुद्रसपाटीपासून हे सुमारे ३ हजार फूट उंचीवर आहे. हीच टेकडी चढताना पावसामुळे अनेक जण घसरून पडले,काही जण जखमी झाले. निसरड्या टेकडीवर एकमेकांवर पडून अनेक भाविकांचे हातपाय मोडले.बंगळुरू येथील सिंधू आणि दिव्या यांचा पाय फ्रॅक्चर झाला,तर मंगळुरू येथील जयम्मा यांचा रक्तदाब कमी झाला.तरिकेरे येथील वेणू हा तरुण गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल आहे.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील गाव सातिवली, ता. वसई, जि. पालघर येथील सर्व्हे नं. २७/१, क्षेत्र २.९०.०० हे . आर. (लावणीलायक), क्षेत्र १.८२.०० हे. आर (पो.ख.) असे एकूण क्षेत्र ४.७२.00 हे.आर., आकार रू.३.७८ हि खाजगी वन जमिन मिळकत श्री. ईश्वर शंकरलाल प्रताप, रा. प्लॉट नं. २६०, चेतन, तळ मजला, सायन रोड नं.२६-अ, सायन (प.), मुंबई ४०० ०२२; यांचे मालकीची कब्जे वहिवाटीची आहे. सदर जमिन मिळकती संबंधात त्यांचे कुलमुखत्यारपत्र धारक श्री. ओनिल जॉन आल्मेडा व श्री. मिल्टन राफायल परेरा दोन्ही राहणार वसई यांनी वरील नमुद जमिन मिळकतीचा मोबदल्याची र.रू.२,८४,५०,०००/- स्विकारून मी, श्रीम. रूपल धर्मेंद्र जोशी, रा .बिल्डींग नं .५, बी १०१, श्रध्दा अपार्टमेंन्ट, वंश हॉस्पीटल जवळ, ९० फुट रस्ता, आशा नगर कांदिवली पुर्व, मुंबई ४०० १०१; अर्थात माझ्या व श्री. नंदकिशोर वैष्णव यांच्या लाभात दि.०१.११ . २००७ रोजी करारनामा निष्पादीत केलेले आहे. परंतु अद्याप सदर जमिन मिळकतीचे टायटल क्लिअर करून अर्थात वनाची नोंद कमी व वारसाची नोंद करून आमच्या लाभात खरेदी दस्ताची नोंद करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. आमची फसवणुक करण्यात आल्याचे दिसत आहे. परंतु माझ्या निदर्शनास आले आहे की, वरील वर्णनाच्या संपुर्ण जमिन मिळकतीचे मालक श्री. ईश्वर शंकरलाल प्रताप यांचे निधन झाले असून त्यांचे कायदेशिर वारस श्रीम. अमिता एस. शहा व श्रीम. मोनिषा संदिप शहा यांच्या संगनमताने श्री . ओनिल जॉन आल्मेडा व श्री. मिल्टन राफायल परेरा यांसकडून तिराईत पक्षाचे हक्क अधिकार निर्माण करण्याची शक्यता दिसून येत आहे. तरी वरील जमिनी मिळकतसंबंधी १) श्री . ओनिल जॉन आल्मेडा रा . माडी नाका, बाळ येशू चर्च जवळ, डोलार बेने मार्सेस, ता . वसई, जि. पालघर, २ ) श्री. मिल्टन रफायल परेरा, पत्ता - सागर पार्क बिल्डींग नं.१, सागरशेत पेट्रोल पंप समोर, वसई प., जि. पालघर तथा कै . ईश्वर शंकरलाल प्रताप रा.प्लॉट नं .२६०, चेतन, तळ मजला, सायन रोड नं. २६-अ, सायन (प.), मुंबई ४०० ०२२; यांचे वारस १) श्रीम. अमिता एस. शहा व २) श्रीम. मोनिषा संदिप शहा यांच्याबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर असेल, तो व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. त्याचप्रमाणे वरील लोकांच्या विरूध्द आम्ही योग्य ती फौजदारी व दिवाणी कायदेशीर कारवाई करणार आहेत.

सही /-
श्रीम. रूपल धर्मेंद्र जोशी
मो.९३२३५७२१७२


# शिंदेंचे कार्यकर्ते काँग्रेसच्या प्रचारात अपक्ष उमेदवार हिना गावितांचा दावा

■ नंदूरबार

**महायुतीचे** ३६ बंडखोर एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. तर काही नाराज नेते विरोधी पक्षाला छुपी मदत करीत आहेत. भाजपाच्या माजी खासदार आणि सध्याच्या अपक्ष उमेदवार डॉ हिना गावित यांनी दावा केला आहे की नंदूरबारमध्ये शिंदेंचे कार्यकर्ते काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार करीत आहेत.

अक्कलकुवा मतदारसंघ भाजपाला सुटावा असा आग्रह हिना गावित यांनी धरला होता. या मतदारसंघातून त्यांना उमेदवारी करण्याची इच्छा होती. मात्र महायुतीच्या जागावाटपात अक्कलकुआ मतदारसंघ भाजपाच्या वाट्याला आला नाही. त्यामुळे गावित यांनी पक्षाला रामराम ठोकून अपक्ष अर्ज भरला आहे.

महायुतीतून बाहेर पडल्यानंतर आता त्यांनी शिंदे गटावर काँग्रेसला मदत केल्याचा आरोप केल्यामुळे शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे.

# भररस्त्यात बंदूक काढून बाईकस्वाराला दाखवली

■ पुणे

**पुण्यात** नवले ब्रिजच्या पुढे वारजेकडे जाताना लागणाऱ्या ब्रिजवर दुचाकीवरून बाईकस्वाराला भररस्त्यात बंदुकीचा धाक दाखवल्याची घटना घडली. राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे दिसते. पुण्यात रोज गुन्ह्यांची संख्या वाढत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. मात्र कधी कोयता गँग तर टोळीयुद्धातून एकमेकांवर भरदिवसा एकमेकांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता पुण्यातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये गाडीवर बसलेला तरूण हातातील बंदूक दाखवत दहशत पसरवताना दिसत आहे.



नवले ब्रिजच्या पुढे वारजेकडे जाताना लागणाऱ्या ब्रिजवर दोन तरूण मोटारसायकलवरून जात होते. त्यावेळी त्यातील मागे बसलेल्या तरूणाने हातात बंदूक काढत मागील दुचाकीवाल्यांवर उगारत त्यांनी भीती दाखवण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान एक चारचाकीतील एकाने हा संपूर्ण प्रकार आपल्या मोबाईलध्ये कैद केला. सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरल झाला असून पोलीस संबंधित तरुणाचा पुणे पोलीस शोध घेत आहेत. पुण्यात भरदिवसा असे प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बीपीएल कंपनीचे संस्थापक टी. पी. गोपलन यांचे निधन

■ बंगळुरू

**बीपीएल** कंपनीचे संस्थापक टी. पी. गोपलन नांबियार यांचे आज बंगळुरूमध्ये निधन झाले. १९६३ मध्ये केरळमधून औद्योगिक कार्याची सुरुवात केली. संरक्षणक्षेत्रासाठी इलेक्ट्रॉनिक उपकरणांची निर्मिती आणि पुरवठा सुरू करण्यासाठी त्यांनी ब्रिटिश फिजिकल लॅबोरॅट्रीज(बीपीएल) या कंपनीची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय उपकरणांची निर्मिती सुरू केली.

१९८२मध्ये देशात आशियायी क्रीडा स्पर्धा झाल्या आणि त्यावेळी देशात रंगीत टीव्हीचे आगमन झाले. नांबियार यांनी ही संधी हेरत टीव्ही आणि व्हीसीआरची श्रेणी बाजारात आणली. बंगळुरूतील पलक्कड येथील त्यांच्या कारखान्यात त्यांनी टीव्ही निर्मिती केली होती. टीव्हीला मिळत असलेल्या यशातून त्यांनी फ्रिज, वॉशिंग मशिन यांची निर्मिती सुरू केली.

# ओवाळीते भाऊराया...

बहीण भावाच्या नातेसंबंधाचा धागा दृढ करणारा दिवस म्हणजे 'भाऊबीज'. यानिमित्ताने अनेकजण आपल्या बालपणीच्या आठवणीत रमतात. यंदाची भाऊबीज कशी साजरी करणार, याबाबत मराठी इंडस्ट्रीमधील नायिकांनी आपले प्लॅन्स आणि जुन्या आठवणी सांगितल्या आहेत.

### कामामुळे भावंडांना भेटणं शक्य होत नाही

शाळेत असेपर्यंत नियमितपणे रक्षाबंधन, भाऊबीज साजरी होत होती पण आता कामामुळे आम्ही सगळीच भावंडं वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे प्रत्येकवेळी एकत्र येऊन भेटणं शक्य होत नाही. इतर भावंडं तरीही भेटतात पण शूटिंगमुळे माझं नक्की नसत. शाळा आणि कॉलेज मध्ये असताना साजरी केलेली भाऊबीज मी प्रचंड मिस करते आणि मला नेहमी धाकधूक लागलेली असते की मी भावंडाना भेटू शकेन की नाही. माझा भाऊ माझ्याकडे जे मागेल ते मी त्याला देईन.

- शरयू सोनावणे, अभिनेत्री



### भावांसाठी ऑनलाईन गिफ्ट



मला चुलत भाऊ आहेत. डोंबिवलीत माझे मावस आणि आत्ते भाऊ आहेत, तेव्हा आम्ही भाऊबीज तिकडेच साजरी करणार आहोत. पण अनेक वर्ष शिक्षणासाठी बाहेर राहिल्यामुळे बरेच वेळा भाऊबीज करता आली नाही. जेव्हा आम्ही एका शहरात असतो आणि आम्हाला सुट्टी असते आम्ही न चुकता एक घर ठरवतो आणि सर्व भावंडं एकत्र जमतो, तिथे आम्ही एकत्र भाऊबीज साजरी करतो. आम्ही जवळपास २०-२५ भावंडं आहोत. माझे भाऊ माज्यापेक्षा लहान आहेत, मी त्यांना सांगते की तुम्हाला जे हवे त्याची मला लिंक पाठवा आणि मी त्यांच्यासाठी ते ऑर्डर करेन.

- तितिक्षा तावडे, अभिनेत्री



### चाळीतल्या बालपणीच्या आठवणी

आमच्याकडे भाऊबीज म्हणजे एक मोठा मेळावा असतो. माझ्या ५ आत्या आणि ३ काका आहेत. पहिल्यापासूनच सर्व आमच्या घरी यायचे. तेव्हा चाळीत घर होतं आणि त्या चाळीतल्या लहान खोलीत आम्ही जवळ पास ३०-३५ लोक खूप आनंदात भाऊबीज साजरी करायचो. आता आम्ही टॉवरमध्ये राहतो आणि आता ही तसेच सर्वजण आमच्या घरी येतात आम्ही खूप खेळतो, गाण्यांच्या भेंड्या लागतात, कराओके होतो, डीजे नाईट होते. प्रचंड धमाल-मस्ती करतो.

- प्राप्ती रेडकर, अभिनेत्री





### भाऊबीजेची खूप जास्त ओढ

आम्ही इतक्या वर्षापासून भाऊबीज साजरी करत आहोत. पण लहानपणीची भाऊबीज आणि आताच्या भाऊबीज साजरा करण्याच्या पद्धतीत एक मोठा फरक मला जाणवलाय. एक म्हणजे लहानपणी आम्ही एकत्र राहायचो तर मज्जा करायचो पण आता मी 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेसाठी शूटसाठी घरपासून थोडी लांब रहाते त्यामुळे मला भाऊबीजेची खूप जास्त ओढ आहे. पहिले आई-बाबा गिफ्ट आणून द्यायचे तेच मी भावाला द्यायची पण आता मी स्वतः जाऊन त्याच्यासाठी त्याला हवं ते गिफ्ट आणणार आहे.

- वल्लरी विराज, अभिनेत्री

## रामचरण चाहत्यांना देणार दिवाळी भेट




ग्लोबल स्टार राम चरण आणि दिग्दर्शक शंकर यांचा पॅन इंडिया चित्रपट, गेम चेंजर १० जानेवारी २०२५ रोजी तेलुगू, तमिळ आणि हिंदी भाषांमध्ये जगभरात प्रदर्शित होणार आहे. तत्पूर्वी येत्या ९ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांना गेम चेंजरची पहिली झलक पाहायला मिळेल. टीझर पोस्टरमध्येच चित्रपटाची भव्यता दिसून येते, ज्यामध्ये राम चरण एका शक्तिशाली अवतारात लुंगी आणि बनियान परिधान करून रेल्वे ट्रॅकवर बसलेला दिसतो. टीझर पोस्टरमधील राम चरणचा हा अवतार सर्वांना आकर्षित करत आहे. जसजशी रिलीज डेट जवळ येत आहे तसतशी गेम चेंजरची उत्सुकता वाढत आहे.

## 'बेबी जॉन' सिनेमाचे मोशन पोस्टर दाखल

बॉलिवुड अभिनेता वरुण धवन याची प्रमुख भूमिका असलेला 'बेबी जॉन' हा सिनेमा सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे. यात त्याच्यासोबत कीर्ती सुरेश आणि वामिका गब्बी याही मुख्य भूमिकांमध्ये आहेत. ऐन दिवाळीत वरुणने या सिनेमाचे दमदार मोशन पोस्टर सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. यात वरुण धवनचा खुंखार लुक थक्क करणारा आहे. चाहते या मोशन पोस्टरला भरभरून कमेंट्स करत आहेत. या पोस्टरमध्ये कुऱ्हाडीवर वरुणच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब दिसत आहे. बॅकग्राऊंडला या सिनेमाचे एंथम म्युझिक वाजतेय. या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये वरुण म्हणतो, 'तू रेडी आहेस ना बेबी, बेबी जॉन सिनेमाचा एक्सक्लूसिव टेस्टर कट मिस करू नका... १ नोव्हेंबरपासून सिनेमागृहात तुम्ही तो पाहू शकाल.' वरुण धवनचा हा खतरनाक लुक चाहत्यांना भलताच



आवडतोय. आज १ नोव्हेंबरला रिलीज होणाऱ्या 'सिंघम अगेन' आणि 'भुल भुलैय्या-३' या सिनेमांसोबत 'बेबी जॉन'चे भव्य ट्रेलर मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे.

## अखेर वरुणने जाहीर केले मुलीचे नाव

'सिटाडेल : हनी बनी' या सीरिजच्या प्रमोशनसाठी अभिनेता वरुण धवन याने नुकतीच 'कौन बनेगा करोडपती १६' मध्ये हजेरी लावली. या शोमध्ये त्याने आपल्या मुलीचे नाव जाहीर केले आहे. त्याने केबीसीमध्ये मुलीसाठी एक अंगाईगीत गायले. नंतर तो म्हणाला की त्यांनी मुलीचं नाव लारा ठवले आहे. या शोमध्ये वरुणने अमिताभ बच्चन यांच्याकडे पालकत्वाचा सल्लाही मागितला. २४ जानेवारी २०२१ला वरुण व नताशा लग्नबंधनात अडकले होते. लग्नानंतर तीन वर्षांनी दोघे आई-बाबा झाले.



## 'आई कुठे काय करते' मालिका निरोप घेणार



स्टार प्रवाह वाहिनीवर गेली बरीच वर्षे म्हणजे डिसेंबर २०१९ ते आतापर्यंत प्रचंड लोकप्रिय ठरलेली 'आई कुठे काय करते' ही मालिका लवकरच निरोप घेणार असल्याचे धक्कादायक वृत्त आले आहे. ही मालिका आणि त्यातली सगळी पात्रे प्रेक्षकांना घरचीच वाटायला लागली होती. पण आता ही मालिका पाहायला मिळणार नाहीये. ही माहिती अभिनेता मिलींद गवळी यांनी इन्स्टाग्रामवरील आपल्या पेजवर दिली आहे. या पोस्टमध्ये मालिकेच्या सर्व कलाकारांनी प्रेक्षकांना दिवाळीच्या शुभेच्छा एका व्हिडीओद्वारे दिल्या आहेत. पोस्टमध्ये मिलींद गवळी म्हणतात, या प्रवासामध्ये कोविडचे दोन लॉकडाऊन्स आले. बंद काळात आधीचेच काही भाग दाखवले गेले. पण प्रेक्षकांनी सर्व काही सहन केलं. ते आमच्यावर भरभरून प्रेम करत राहिले, असेही त्यांनी पुढे स्पष्ट केले.

## तेजस्विनी पंडित झाली मावशी

दिवाळीमध्ये सर्वांनाच काही ना काही गिफ्ट मिळते. पण अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिला या दिवाळीत फारच मोठे गिफ्ट मिळालेय. 'मावशी...' अशी हाक मारणारी गोड भाची तिच्या जीवनात आलीये. यासाठी तिने आपली बहीण आणि मेव्हणे यांचे आभार मानले आहेत. ही माहिती तेजस्विनीने इन्स्टाग्रामवर काही फोटो शेयर करत दिली आहे. या फोटोंमध्ये बाळाचा इवलासा हात दिसतोय. बाळाने मावशीचे बोट घट्ट पकडलेले दिसत आहे आणि प्रचंड खुष झालेली तेजू दिसतेय. आपला आनंद भरभरून व्यक्त करताना तेजस्विनी म्हणते, 'माझ्यासाठी सगळ्यात मोठी, सगळ्यात खास आणि आयुष्यभराची दिवाळी गिफ्ट माझ्या बहिणीने आणि दार्जीनी मला दिली आहे. आमच्या घरात लक्ष्मी आली. ही दिवाळी माझ्यासाठी एकदम खास आहे, मी मावशी झालेय! होऊ दे खर्च...' असेही ती सांगते.



## नव्या देखण्या घराशी अमृताचे हितगुज



मराठी चित्रपटसृष्टीमधली संवेदनशील अभिनेत्री अमृता खानविलकर हिने सोशल मीडियावर नुकताच एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. याचवेळी बॅकग्राऊण्डला ती घराशी हितगुज करतानाही पाहायला मिळते. घर म्हणजे खरं तर घराच्या चार भिंती... पण अमृताने नव्या घराशी जवळिकीचं नातं जोडत त्याला आपला मित्रच बनवलेलं आहे. हितगुज करताना ती म्हणते, चला अखेर आपली भेट झालीच... कधीकाळी दूर कुठेतरी तुझं स्वप्न पाहिलं होतं आणि ते पूर्ण करण्याचा रोज प्रयत्न सुरू होता.... आणि आपली ही पहिली दिवाळी... तुला खूप काही सांगायचंय, मला काय आवडतं काय नाही, मनातली गुपितं, सगळं हळूहळू कळेलच तुला... तुलाही मला खूप काही सांगायचं असेल... माझी पूर्ण तयारी आहे. तू अजून हळूहळू आकार घेतोयस. तुझ्या कानाकोपऱ्यात मी माझं सारं जग बसवायचा प्रयत्न करतेय... असंही ती सांगते.



## यंदाची दिवाळी सेटवरच!

अभिनेत्री वाणी कपूर यंदाची दिवाळी कुटुंब आणि मित्रांसोबत साजरी करू शकणार नाही, ती सेटवरच सणाचा आनंद लुटणार आहे. वाणी कपूर म्हणाली, 'माझ्यासाठी हे वर्ष खूपच व्यस्त होते, जिथे मी माझ्या आगामी प्रोजेक्ट्ससाठी शुटिंगमध्ये बिझी होते. मी स्वतःला भाग्यवान समजते की मला इतक्या वेगवेगळ्या चित्रपटांचा भाग होण्याची संधी मिळाली. इंडस्ट्रीतील काही सर्वोत्तम निर्माते, दिग्दर्शक, आणि सह-अभिनेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे याबद्दल मी खूपच आभारी आहे.' ती पुढे म्हणाली, 'घरातल्यांसोबत दिवे लावणे, गोडधोड फराळावर ताव मारणे असे दिवाळीत माझे रूटीन असते. यंदा, हे क्षण मी खूपच मिस करणार आहे.' वाणी कपूरसाठी या वर्षी पाच प्रमुख प्रोजेक्ट्सवर काम केले आहे. अजय देवगणसोबत 'रेड २' आणि बदतमीज गिलची शूटिंग पूर्ण केल्यावर, सध्या वाणी यूकेमध्ये फवाद खान सोबत एका आंतरराष्ट्रीय चित्रपट अबीर गुलालच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे.


## जुईचे अनोखे दिवाळी सेलिब्रेशन

आनंद इतरांसोबत वाटला तर तो द्विगुणीत होतो असं म्हणतात. अभिनेत्री जुई गडकरी या आनंदाची प्रचिती गेल्या २० वर्षांपासून अनुभवतेय. जुई मुळची कर्जतची. एकत्र कुटुंबात ती वाढलेली असल्याने सण कोणताही असो संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन तो जल्लोषात साजरा करतात. पण जुईचं आणखी एक कुटुंब आहे जे गेले २० वर्ष तिने अगदी घट्ट जपलं आहे. हे कुटुंब म्हणजे पनवेल इथल्या शांतीवन आश्रमातील निराधार आणि कुष्ठरोगाशी झुंज देणारे आजी-आजोबा. कॉलेजमध्ये असल्यापासून जुई न चुकता दिवाळीचा सण या निराधार आजी-




आजोबांसोबत साजरा करते. या उपक्रमात तिला तिच्या मित्रपरिवाराचाही साथ लाभते. दिवाळीच्या दिवशी जुई आणि तिचा मित्रपरिवार मिळून संपूर्ण आश्रम सजवतात. फराळ आणि गोडधोड जेवणाचा बेतही असतो. गाण्याचा कार्यक्रमही साजरा केला जातो. कॉलेजच्या दिवसांमध्ये नाटकाच्या तिकिटातून मिळालेले पैसे या आश्रमाला देणगी स्वरुपात दिले जायचे. आता बरेच जण या उपक्रमाला सढळ हस्ते हातभार लावतात. जे पैसे जमतात ते या आजी-आजोबांचं वर्षभराचं रेशन, औषधपाणी, कपडे यासाठी वापरले जातात.

# नवाकाळ शब्दकोडे-१०६४



**आडवे शब्द –**

१. तांबडे कमळ ५. बहावा वृक्ष ८. विशेष १०. आंघोळ न केलेला १२. रामायणातील एक जंगल १४. कष्टकरी १५. झळ १६. रडगाणे १८. ओढवून घेतलेली पीडा २१. बछडा २३. मदतीसाठी देवाची प्रार्थना २५. नांगरणीचा प्राणी २६. भावनाप्रधान २७. छोटी नथ २९. पद्धतशीर ३१. चिकटणे, मिठीत जाणे ३४. सिंहासन ३५. स्वाद ३६. निरीक्षण ३७. छोटा टॉर्च ३८. वेडपट ४०. चारित्र्य ४१. दवंडी ४२. इमारतीत खाली-वर पायी जाण्याचा मार्ग ४३. हुशार, एक कीटक ४५. अशक्त, कृश ४६. श्रीकृष्ण ४७. इंद्रिय ४८. घर, सदन ४९. पुष्कळ ५०. भार ५१. गाय पाळणारा ५३. स्वतःचे ५४. हडळ ५६. चुगली ५८. वस्त्र विणण्याचे साधन ५९. हुद्दा, संगीत नाटकातील गाणे ६०. धसका ६१. चण्याची डाळ व गुळाचा पदार्थ ६२. जंजिरा ६४. गुरुत्वाकर्षण व गतीचे नियम मांडणारा शास्त्रज्ञ ६५. अंधःकार ६७. दुष्ट स्त्री ६८. कवाड ६९. अमूल्य ७०. सतत ७२. उत्तर ७३. पाळलेली मांजर ७६. मोहरी ७८. स्थळदर्शनाचे प्रवासी ७९. गोळा ८०. पैठणीतले धागे ८१. दिवाळीत केला जाणारा तळलेला गोड पदार्थ ८३. कावळा ८५. शेवट ८६. बांधकामासाठी भक्कम लाकूड ८८. नाम, ख्याती ८९. मिठाची चव ९०. उत्सव ९१. मिळवता, अर्थार्जन करणारा ९४. लेखनपद्धती ९६. बदनामी ९७. चिंतन ९८. ताबडतोब ९९. वेदना १००. अस्थिर

**उभे शब्द –**

१. धनुष्य धारण केलेला, श्रीराम २. बाजू, कैवार ३. अस्वीकार ४. डोंगरउतार ६. बुद्धी ७. तिष्ठणे ९. श्रद्धाळू १०. देवांचा राजा ११. तपस्या करणारा १३. मुलांच्या खेळातील काचेच्या गोट्या १७. दोलायमानता १८. पक्षी १९. पोळी भाजण्याचा पत्रा २०. ऐकू येणारे, मधुर २२. अष्टविनायकांपैकी एक २४. वावटळ २७. चण्याच्या डाळीचे पीठ २८. उफराटे, अनपेक्षित ३०. राख ३२. त्वचेवरील सूक्ष्म केस ३३. पाण्यात बुडी मारणे ३४. दहावी रास ३८. नेत्र, नयन ३९. होडी ४०. रक्तवाहिनी ४१. खोडकर ४२. अतिशय प्रिय ४४. तिरसट ४५. कोवळे झाड ४६. पादत्राणांचा उंची व नाजूक प्रकार ४७. आघाडा, एक औषधी वनस्पती ४८. मरणानंतरचे स्थान ४९. चिन्ह ५०. चप्पल ५२. नमस्कार ५५. ख्याती ५६. कासंडी, दुधाचे भांडे ५७. अफवा, लोकवार्ता ५९. पडदा, आवरण ६१. हलक्या आवाजात स्वतःशी बोलणे ६२. दहशत ६३. आपपरभाव ६४. फुफ्फुसांचा गंभीर आजार ६५. लांडग्यासारखाच एक वन्य पशू ६६. सूर्यापासून मिळणारी ऊर्जा ६८. चिकित्सालय ७०. पतीची/पत्नीची आई ७१. मडक्याचा तुकडा ७४. समीक्षा करणारा ७५. सगळेजण ७७. युद्धभूमी ७९. पृथ्वी ८०. पितृत्व ८१. साधू, मनस्वी पुरुष ८२. घोडे जुंपलेले पौराणिक वाहन ८४. कारस्थान ८५. पतित ८६. रायवळ आंब्याचे सारस्वती रायते ८७. रुची, स्वाद, आस्वाद ८९. खूप खाणारा, अधाशी ९२. चोप ८३. होडके ९५. पिवळा ९७. साखर कारखान्यात तयार होणारा एक उपपदार्थ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०६३ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. आजीवन ४. तगादा ६. लोककथा ६. गौण ११. रक्तोत्पल १२. कण १३. सरोवर १४. सखा १५. वृद्धाश्रम १७. लोणकढे १८. वसाहत २०. रव २१. हताश २३. कढी २६. रान २८. रमण ३०. अंगमर्दन ३२. शीड ३४. कवायत ३७. नौदल ३९. धन ४०. अलग ४१. जाळ ४२. नलिका ४४. ईशस्तवन ४७. कालव ४८. तवंग ५१. तवा ५२. मवाळ ५४. गुंड ५५. टणक ५७. मैनाक ५९. लवकर ६०. कंठ ६३. नाममात्र ६५. लग्गा ६६. कांचनमृग ६८. भाष्य ६९. कुहू ७०. सह ७१. अपराध ७३. गडी ७४. अवतरण ७६. पाट ७७. मडके ७८. माज ७९. नवजात ८१. बारकावा ८३. नकळत ८५. सून ८६. विवाहित ८७. वसंत ८९. रगड ९१. वृकोदर ९२. मीन ९४. तिसरा ९५. रहाट ९७. समक्ष ९९. ददात १००. कल १०२. डकली १०७. माळकरी १०८. मज १०९. भिकारसावकार ११०. दुखापत १११. शुक

**उभे शब्द :** २. जीर्णोद्धार ३. नरम ४. तत्परता ५. गाल ६. लोणकढी ७. कस ८. थारोळे ९. गौरव १०. आखात १२. कणकण १४. सहनशील १६. श्रवणीय १९. सारा २१. हट्टी २२. शरद २४. जंग २५. कर्दनकाळ २७. नेकजात २९. मलई ३१. मध ३३. डगला ३५. वाळवंट ३६. तन ३७. नौका ३८. मस्तवाल ४०. अवगुंठन ४३. लिप्त ४५. शत ४६. नमकहराम ४९. गणना ५०. मैना ५३. वार ५६. कमकुवत ५७. मैत्र ५८. कलह ६०. कंचनी ६१. तंगडी ६२. विभाजन ६४. माहूत ६७. मृगजळ ७०. सण ७१. अटकाव ७२. धडपा ७४. अजानवृक्ष ७५. रविवार ७६. पार ७८. माकडहाड ८०. वसू ८१. बातमीदार ८२. वासंतिक ८३. नगर ८४. तट्टू ८६. विदर्भ ८८. तसलमात ९०. तूस ९३. नत ९६. टकमक ९८. मक्षिका १०१. संकट १०३. लीज १०४. ठोसा १०५. काका १०६. रेखा

## अरविंद सावंत मला 'माल' म्हणाले शायना एनसींचा आरोप! गुन्हा दाखल

■ मुंबई



**इम्पोर्टेड** माल येथे चालत नाही, आमच्याकडे ओरिजनल माल चालतो आणि ओरिजनल माल आहे अमिन पटेल आहेत, असे वक्तव्य अरविंद सावंत यांनी मुंबईतील मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अमित पटेल यांच्या प्रचारादरम्यान केले होते. त्यावरुन आता नवा वाद उफाळला असून महायुतीच्या उमेदवार शायना एनसी यांच्या तक्रारीनंतर नागपाडा पोलिसांनी आज अरविंद सावंत यांच्यावर गुन्हा दाखल केला.

शायना एनसी आज सकाळी मनसे प्रमुख राज ठाकरेंना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेल्या होत्या. त्यानंतर त्यांनी अरविंद सावंत यांनी मला माल म्हणून संबोधले असा आरोप माध्यमासमोर केला. शायना एन सी यांनी माध्यमांना सावंत यांचा ऑडिओ ऐकवला. त्यानंतर त्या म्हणाल्या की, यातून अरविंद सावंत आणि त्यांच्या पक्षाची मानसिकता दिसते. त्यांची विचारधारा दिसते. जे एका महिलेला माल म्हणून संबोधतात. मी विचारु इच्छिते की मुंबादेवीतील प्रत्येक महिला ही माल आहे का? तेही तुम्ही अशा व्यक्तीला बोलत आहात, ज्यांनी कधीतरी तुमच्यासाठी प्रचार केला होता. मोदींचे नाव लावत तुम्ही जिंकला आणि आज तुम्ही मला माल म्हणता? मी त्यांच्या नेतृत्वाला विचारू इच्छिते की उद्धव ठाकरे का गप्प आहेत, शरद पवार का गप्प आहेत, संजय राऊत का काही बोलत नाहीत? तुम्ही महिलेला एक माल म्हणून बघत असाल तर महाराष्ट्रातील महिला तुम्हाला कधीही मतदान करणार नाहीत. तुम्ही महिलांना माल म्हणालात, तर तुमचे हाल होणार. अरविंद सावंत यांनी या वादावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, ५० वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत माझ्या इतका स्त्रियांचा बहुमान करणारा माणूस तुम्हाला दुसरा मिळणार नाही.

## भाजपाचे 'बटेंगे तो कटेंगे' समाजवादीचे 'जुडेंगे तो जीतेंगे'

पान १ वरून

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांचे छायाचित्र आहे. लखनौ बरोबरच पूर्वांचलच्या गोरखपूरच्या पट्ट्यातही हे होर्डिंग लावले आहेत. भाजपा आणि समाजवादी पक्षात हे बॅनरयुध्द सुरू असताना राज्यातील तिसरी महत्त्वाच्या निषाद पक्षाने अध्यक्ष संजय निषाद यांनाच २७ सालातील मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून पुढे आणले आहे. काँग्रेसने या निवडणुकीत समाजवादी पार्टीला सहाय्य करण्याची रणनिती आखली आहे. उत्तर प्रदेशात सीसामऊ, कटेहरी, करहल, कुंदरकी, फूलपूर, गाजियाबाद, मझवां, खैर व मिरापूर या ९ जागांवर पोटनिवडणूक होत आहे. दोन्ही पक्षांकडे यातील चार चार जागा असून, मिरापूरची जागा लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय चार जागा या समाजवादी पार्टीकडे होत्या तर ४ मतदारसंघ भाजपाकडे होते.

## बारामतीत पवार कुटुंबाचा दोन ठिकाणी पाडवा

पान १ वरून

लोकांची व्यवस्था होणार नाही. या प्रकारे पुढील वाटचाल होणार आहे. दिवाळी पाडव्यांसंदर्भात अजित पवारांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत पहाटे साडेसहा वाजल्यापासून कार्यक्रम सुरू होणार असल्याचे म्हटले आहे. बारामतीकरांनो, सालाबादाप्रमाणे यंदाचा हा दिवाळी सण एकत्र येऊन आपण सगळे साजरा करूया. दीपावली पाडव्यानिमित्त काटेवाडी येथील माझ्या निवासस्थानी मी तुमचे स्वागतो करतो. चला, बंधुभाव जपूया, असे अजित पवारांनी पोस्ट मध्ये म्हटले आहे.

तर पाडव्याच्या आदल्या दिवशी आजही गोविंदबागेत दिवाळीनिमित्त खूप मोठी गर्दी होती. पाडव्याला खूप गर्दी होत असल्याने अनेक कार्यकर्ते आजच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शरद पवारांना भेटायला आले होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पवारसाहेबांवर प्रेम करणारे हजारो लोक आज आले होते. उद्याही येतील. हा एक असा दिवस असतो ज्या दिवशी आम्ही सगळ्यांची आतुरतेने, प्रेमाने वाट पाहात असतो. लोक आदरणीय पवार साहेबांना भेटायला येतात. आमच्यासाठी हा सर्वात आनंदी आणि महत्त्वाचा दिवस असतो.

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीतही बारामती मतदारसंघात पवार कुटुंबातच लढत होणार आहे. यावेळी अजित पवार आणि त्यांच्या सख्ख्या भावाचा मुलगा युगेंद्र पवार एकमेकाविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. ही निवडणूक पवार कुटुंबातील कटुता आणखी वाढवेल.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार सध्या बारामतीत ठाण मांडून आहेत. ३ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीचे तीन दिवस ते संपूर्ण बारामती तालुका पिंजून काढणार आहेत. प्रत्येक गावात जाऊन मतदारांशी संवाद साधण्याचा ते प्रयत्न करणार आहेत. आज त्यांनी ५० हून अधिका गावांना भेटी दिल्या. त्यानंतर ते म्हणाले की, काहींनी ठरवले होते की लोकसभेला ताईंना निवडून द्यायचे आणि विधानसभेला दादाला. त्याबद्दल जास्त बोलणार नाही. परंतु मागच्या वेळी पहिल्या नंबरच्या मताधिक्क्याने पाठवले. त्यामुळे मी पहिल्या नंबरचा निधी आणला. बारामतीत ९ हजार कोटी निधी देण्याचे काम केले. यावेळीही विधानसभेत चांगल्या मताधिक्क्याने संधी द्या.

## टँकरमध्ये मुलीचा मृतदेह सापडला

■ फरिदाबाद

**हरियाणातील** फरीदाबादमध्ये एका खासगी टँकरमध्ये मुलीचा मृतदेह आढळला. मुस्कान (१७) असे मृत मुलीचे नाव असून ती एसजीएम नगर येथील रहिवासी होती. मुलगी एक दिवसांपूर्वी घरातून बेपत्ता झाली होती. टँकरच्या चालकाला पाण्याच्या पाईपमध्ये काही तरी अडकल्याचे लक्षात आले. त्यानंतर चालकाने टँकरमध्ये चढून पाहिले असता आत मुलीचा मृतदेह आढळला. त्यानंतर चालकाने दिलेल्या माहितीनंतर पोलीसही घटनास्थळी पोहोचले. टँकर कापून मुलीचा मृतदेह बाहेर काढला. मुस्कानचे वडील उस्मान यांनी सांगितले की, मुलगी गेल्या काही दिवसांपासून काही कारणामुळे डिप्रेशनमध्ये होती. तिला कितीतरी वेळा विचारायचा प्रयत्न केला, ती काहीच बोललीच नाही. रात्री साडेनऊ वाजता ती न सांगता उशिरा घराबाहेर पडली आणि त्यानंतर घरी परतलीच नाही. त्यांनी शेजारी आणि नातेवाइकांमध्ये तिचा शोध घेतला, मात्र पत्ता लागला नाही. कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी महावीर कुमार यांनी सांगितले की, मुलीचा मृतदेह पाण्याच्या टँकरमध्ये कसा पोहोचला, याचा तपास सुरु केला आहे.

## आयआयटी बॉम्बेमध्ये पुन्हा वाद मकरंद देशपांडेची २ नाटके रद्द

■ मुंबई

**सुप्रसिद्ध** लेखक-दिग्दर्शक आणि अभिनेते मकरंद देशपांडे दिग्दर्शित सर सर सरला आणि सियाचीन या दोन नाटकांचे सादरीकरण इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे येथे होणार होते. पण या नाटकांना योग्य प्रकारे परवानगी घेण्यात आली नाही, असे कारण सांगून प्रशासनाने काही दिवसांपूर्वी या नाटकांचे प्रयोग रद्द केले. २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी आयआयटी बॉम्बेच्या ड्रामाटिक क्लब - फोर्थवॉलने आयोजित केलेल्या थिएटर फेस्टिव्हलचा एक भाग म्हणून ही नाटके सादर केली जाणार होती.

सर सर सरला आणि सियाचीन या दोन नाटकात सियाचीन मधील लष्करी जवानांचे चुकीचे चित्रण आहे, असे सांगून नाटकाच्या थीमवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. त्यावरून वाद निर्माण झाल्यामुळे या दोन नाटकांच्या सादरीकरणाला प्रशासनाने परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे या नाटकांचे शो रद्द करावे लागले, असे काही विध्यार्थ्यांनी सांगितले.

## 'राज'पुत्र मतदारांच्या दारी अमित ठाकरेंचा प्रचार सुरू

पान १ वरून

कोणीही आलेले नाही. मला लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. ते कोणाला मतदान करतायत हे त्यांना समजले पाहिजे.

अमित ठाकरे असेही म्हणाले की, मतदारसंघातील लोक खूप चांगला प्रतिसाद देत आहेत. ते सेल्फी काढतात, ओवाळतात. मला शुभेच्छा देतात. मनसेच्या प्रचारासाठी मी २००९ मध्येही अशा प्रकारे फिरलो आहे. मला त्यांचा प्रतिसाद बघून खूपच छान वाटत आहे. अनेक लोक त्यांच्या समस्या सांगत आहेत. यातील काही समस्या या लगेच सोडवण्यासारख्या असतील तर त्या आम्ही लगेचच सोडवण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.

## प्रतिज्ञापत्रातील वयामध्ये गोंधळ सोरेन यांची उमेदवारी बाद होणार?

पान १ वरून

उमेदवारी अर्ज दाखल केला. गेल्या निवडणुकीत त्यांनी अर्ज भरताना त्यांचे वय ४२ वर्षे लिहिले होते. यंदा मात्र त्यांनी आपले वय ४९ लिहिले आहे. त्यामुळे पाच वर्षांत वय ७ वर्षे कसे वाढले, असा प्रश्न भाजपाने उपस्थित केला आहे. जर यंदाचे प्रतिज्ञापत्र खरे असेल तर त्यांनी गेल्या वेळी चुकीच्या प्रतिज्ञापत्रावर निवडणूक जिंकली होती, असेही भाजपाने म्हटले आहे.

झारखंडचे मुख्यमंत्री झाल्यापासून हेमंत सोरेन हे भाजपाच्या निशाण्यावर आहेत. त्यांना अनेक प्रकरणात जेलमध्येही टाकण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन दिला आहे. दरम्यान झारखंड मुक्ती मोर्चाचे नेता मनोज पांडे यांनी म्हटले आहे की, आम्ही सारी कागदपत्रे दिली होती तेव्हा निवडणूक अधिकारी शांत होते. त्यानंतर आता भाजपाला आपला पराभव दिसत असल्याने ते ही चाल खेळत आहेत. आम्ही फसवणूक करणारे नाही. भाजपाचे अनेक नेते आपल्या कागदपत्रांमध्ये बनावट पदवी प्रमाणपत्रे जोडतात.

## मराठा आंदोलकांच्या जोरदार घोषणाबाजीमुळे भाजपाच्या उमेदवाराने अक्षरशा पळ काढला

■ सेलू

**लोकसभेप्रमाणेच** विधानसभा निवडणुकीतही मराठा आरक्षणाचा मुद्दा तापण्याची चिन्हे दिसत आहेत. सेलू तालुक्यात याची झलक दिसली. तालुक्यातील बोरगाव येथे प्रचारासाठी आलेल्या भाजपा उमेदवाराला मराठ्यांच्या घोषणाबाजीमुळे गावातून अक्षरशः पळ काढावा लागला. जिंतूर विधानसभा मतदारसंघात महायुतीमधून भाजपाने मेघना बोर्डीकर यांना उमेदवारी दिली आहे. बोर्डीकर बुधवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास सेलू तालुक्यातील आहेर बोरगाव या गावात पोहोचल्या. त्यांच्या वाहनांचा ताफा गावात दाखल होताच मराठा तरुण आणि ग्रामस्थांनी त्यांच्या ताफ्यासमोर जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे वातावरण तापले. बोर्डीकर गाडीतून खाली उतरून जवळच्या एका मंदिरात गेल्या. तिथेही मराठ्यांनी घोषणाबाजी करीत त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर बोर्डीकर यांनी प्रचार सोडून गावातून काढता पाय घेतला.

## दिवाळीनिमित्त मतदारसंघात उमेदवारांच्या मतदारांशी भेटी

■ मुरबाड

**दिवाळीनिमित्त** मुरबाड मतदारसंघात उमेदवार मतदारांच्या भेटी घेत,संवाद साधत आहे. या मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष पवार व माजी आमदार गोटीराम पवार, यांच्यासह त्यांचे समर्थक या भागात मतदारांच्या भेटी घेतल्या. त्याचप्रमाणे महायुतीचे उमेदवार किसन कथोरे व त्यांचे समर्थक यांनीदेखील मुरबाड तालुक्यात प्रचार सुरू केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी सदस्य परंतु सध्याचे मुरबाड येथील अपक्ष उमेदवार शैलेश वडनेरे यांनीदेखील दिवाळी निमित्ताने मुरबाड तालुक्यातील अनेक गावांत संवाद साधला.

## सिंचन घोटाळ्यावरून अजितदादांच्या गौप्यस्फोटामुळे देवेंद्र फडणवीस फसले

पान १ वरून

खुली चौकशी करण्याच्या आदेशावर सही केली होती. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मला ती फाईल दाखवली होती.

अजित पवार यांच्या याच वक्तव्याचा आधार घेत जयंत पाटील म्हणाले की, अजित पवार म्हणतात ते खरे असेल तर त्यातून देवेंद्र फडणवीस हे २०१४ पासून अजित पवार यांना ब्लॅकमेल करीत होते हे स्पष्ट होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडण्याचे कुटील कारस्थान फडणवीस दहा वर्षांपासून करत होते. फडणवीसांचे राजकारण हे ब्लॅकमेलिंगवर आधारित आहे.

## ज्याचा १ आमदार नाही, तो मुख्यमंत्री कोण होणार सांगतो! सरवणकरांचा टोला

पान १ वरून

निवासस्थानी गेलो, हे सत्य आहे. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत भेट झाली हे असत्य आहे. मी तिथे स्टाफ-कर्मचाऱ्यांशी बोललो, गप्पागोष्टी केल्या. मुंबईतील आमदार असल्यामुळे वर्षावर दिवसातून एक-दोनदा जात असतो. मात्र मुख्यमंत्री आराम करत असल्यामुळे भेट झाली नाही. आम्ही महायुतीचा धर्म पाळणार आहोत. महायुतीचा उमेदवार हा आमचा उमेदवार असल्याचे देवेंद्र फडणवीसच म्हणाले आहेत. या महायुतीत मनसेला वाव नाही, असे फडणवीसांनी सांगितले, त्यामुळे मीच महायुतीचा उमेदवार आहे.

अमित ठाकरेंबद्दल सरवणकर म्हणाले की, काही वैयक्तिक मते असतात, ज्याचा एकही आमदार नाही, त्याने मुख्यमंत्री कोण होणार हे सांगणे हास्यास्पद आहे. पण मी त्यांच्यावर टीका करावी असे वाटत नाही. मुख्यमंत्री कोण होणार हे महायुती ठरवेल. मी या मतदारसंघातून महायुतीचा उमेदवार म्हणून उभा राहणार आहे आणि जनतेच्या आशीर्वादाने निवडून येणार आहे, एवढेच मला कळते. मी कुठेही एकटा पडलेलो नाही, जनता माझ्यासोबत आहे.

## महाजनांकडून सतत फोन! पण मी माघार घेणार नाही

■ जळगाव

**डॉ. सोनवणे यांचे वक्तव्य**

**गिरीश** महाजनांकडून मला सतत फोन येत आहेत, पण मी माघार घेणार नाही, असे वक्तव्य भाजपाचे माजी उपमहापौर डॉ. अश्विन सोनवणे यांनी केले आहे. जळगाव शहर मतदारसंघातून भाजपाचे विद्यमान आमदार सुरेश भोळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात बंडखोरी करत भाजपाचे डॉ. अश्विन सोनवणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

अश्विन सोनावणे यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, यासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्याकडून सतत निरोप येत आहेत. पण मी त्यांची माफी मागतो. मी कुठल्याही परिस्थितीत उमेदवारी अर्ज मागे घेणार नाही, असे डॉ. सोनावणेंनी म्हटले. भाजपाचे माजी उपमहापौर डॉ. अश्विन सोनवणे म्हणाले की, गेल्या कित्येक वर्षांपासून एकनिष्ठ कार्यकर्त्यांना डावलले जात आहे. निवडणुकीत फक्त काम करून घेतले जाते.

## छटपूजेला सार्वजनिक सुट्टी जाहीर करा! राज्यपालांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ नवी दिल्ली

**येत्या** ९ नोव्हेंबरला छटपूजा आहे. मात्र दिल्लीतील सणांच्या सुट्ट्यांच्या यादीत छटपूजा नसल्याने या दिवशी सार्वजनिक सुट्टी नसते.आता हीच बाब लक्षात घेऊन दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के सक्सेना यांनी मुख्यमंत्री आतीशी यांना पत्र लिहून दिल्लीत छटपूजेला सार्वजनिक सुट्टी जाहीर करा अशी सूचना केली आहे.

दिल्लीच्या नायब राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, छटपूजा हे आस्थेचे पर्व आहे. ते ४ दिवस चालते. तिसर्या दिवशी सूर्यास्ताच्या वेळेस सूर्याला अर्घ्य दिले जाते. हा अत्यंत महत्वाचा क्षण असतो. छटपूजेशी लोकांच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहे. पण दिल्ली सरकारकडून त्यासाठी सार्वजनिक सुट्टी दिली जात नाही. पण यावेळेस ७ नोव्हेंबरला सार्वजनिक सुट्टी द्यावी.

# नवा काळ

• पुणे । शनिवार २ नोव्हेंबर, २०२४ • पान -८

## थोडक्यात...

### देवेंद्र फडणवीस यांची सुरक्षा वाढवली

**मुंबई -** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली असून, सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय सुरक्षा यंत्रणांनी घेतली. गोपनीय रिपोर्टमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या जिवाला धोका असल्याचे बोलले जात आहे. देवेंद्र फडणवीस यांना आधीपासून झेड प्लस सुरक्षा आहे. मात्र गुप्तहेर संस्थांना मिळालेल्या सूचनेनंतर त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. फोर्स १ मधील अत्याधुनिक शस्त्रधारी असलेले ४ कमांडो फडणवीस यांच्या सुरक्षेत तैनात करण्यात येणार आहेत. तर एकूण १८ जवान त्यांच्या सुरक्षा यंत्रणेत वाढवण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूरमधील घराबाहेर हे कमांडो तैनात करण्यात आले आहेत.

### शिवसेना शिंदे गटात बंडखोरी अशोक गावडे लढण्यावर ठाम

**नवी मुंबई -** बेलापूरमधील स्थानिक शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी उपमहापौर अशोक गावडे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीतून माघार न घेता निवडणूक लढविण्याचा निर्धार कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेण्यात आला. आमच्या मागण्या मान्य होत नसल्याने आम्ही निवडणूक लढवत आहोत, मागण्या मान्य झाल्यास जो निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील तो मान्य करू, अशी प्रतिक्रिया अशोक गावडे यांनी दिली.

### नोव्हेंबरमध्ये १३ दिवस बँकांचे काम बंद राहणार

**नवी दिल्ली -** नोव्हेंबर महिन्यात एकूण १३ दिवस बँका बंद राहणार आहेत. या बरोबरच या महिन्यातील ५ शनिवार व ४ रविवार असे एकूण ९ दिवस शेअर बाजारही बंद राहणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार विविध सणांमुळे देशभरातील बँकांचे काम १३ दिवस बंद राहणार आहे. या काळात ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून व्यवहार करता येतील. महाराष्ट्रातील दिवाळी पाडवा, त्रिपुरा, कर्नाटक, जम्मू काश्मीर, उत्तराखंड, मेघालय, सिक्कीम व मणिपूरमधील दिवाळी व कुट महोत्सव, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थानमधील गोवर्धन पूजा, नववर्ष दिन, ७ व ८ नोव्हेंबरला बंगाल, बिहार, झारखंडमधील छटपूजा, १२ नोव्हेंबरला चंदीगड, ओडिशा, नागालँड सह इतर अनेक राज्यांत साजरा होणार ईगाल बग्वाल, १५ नोव्हेंबरला गुरु नानक जयंती, कार्तिक पौर्णिमा, १८ नोव्हेंबरला कर्नाटकातील कनकदास जयंती याबरोबरच शनिवार व रविवार असे एकूण १३ दिवस कामकाज होणार नाही.

### सातपुड्यातील शिखरावरून पडून तरुणाचा मृत्यू

**नंदुरबार -** सातपुड्यातील सर्वोच्च शिखरावर सुरू असलेल्या अस्तंबा ऋषीच्या यात्रोत्सवादरम्यान दर्शनासाठी गेलेल्या तरुणाला भोवळ आल्याने तो खोल दरीत पडला. यात त्या तरुणाचा मृत्यू झाला. निखिल वाडीले असे मृत तरुणाचे नाव असून, शहादा तालुक्यातील रहिवासी आहे. शिखरावर चढल्यानंतर त्या तरुणाला अचानक भोवळ आल्याने तो खोल दरीत पडला. यात त्याचा मृत्यू झाला. खोल दरीत पडलेला या तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला असून, धडगाव पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली.

### अहेरीमध्ये एमबीएचा विद्यार्थी नदीत बुडाला

**गडचिरोली -** अहेरी तालुक्यातील वांगेपल्ली येथे आज सकाळी एमबीएचे शिक्षण घेणारा तरुण नदीत बुडाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तेजस राजू बोम्मावार (२१) असे या तरुणाचे नाव आहे. राजू बोम्मावार याचे वांगेपल्ली येथे हार्डवेअरचे दुकान आहे. त्यांना दोन मुले आहेत. मोठा मुलगा तेजस हा पुण्यात एमबीएचे अंतिम वर्षाचे शिक्षण घेत होता. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये तो गावी आला होता. आज सकाळी तो काही मित्रांसह प्राणहिता नदीवर आंघोळीला गेला होता. परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नागरिक, पोलीस आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बोटीने तेजसचा शोध घेतला. मात्र तो कुठेच सापडला नाही.

---

## टोचा

**मनसे अध्यक्ष प्रत्येक निवडणुकीवेळी जी भूमिका घेतात त्यानुसार त्यांचे मित्रपक्ष ठरतात आणि मग या मित्रपक्षाच्या नेत्यांची त्यांच्या घरी रीघ लागते. प्रत्येक नेता राज ठाकरे यांना घरी जाऊन भेटल्यावर बाहेर येऊन पत्रकारांना सांगतो की, या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. आमचे अनेक वर्षांपासून घरचे संबंध आहेत म्हणून मी भेटायला आलो. सतत घडणाऱ्या या घटनांमुळे मतदार गोंधळला असून, पुढील वेळी निवडणूक जाहीर होण्यापूर्वी राज ठाकरे कुटुंबाशी कुणाकुणाचे घरचे संबंध आहेत ते नेत्यांनी जाहीर करावे.**

---

# आमचे फोन आजही टॅप होतात
## रश्मी शुक्लांवर राऊत यांचा आरोप

■ मुंबई

**राज्याच्या** पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या माध्यमातून आमचे फोन आजही टॅप केले जात असल्याचा दावा राऊत यांनी केला. बोगस आधार कार्डच्या माध्यमातून हजारो बोगस नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट केले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा आणि त्यांचा आयटी सेलचा हा उपक्रम असतो. हे अत्यंत गंभीर आहे. याबाबत आम्ही वारंवार तक्रारी केल्या, पण निर्णय होत नाही, असा आरोप राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले की, रश्मी शुक्ला यांना



हटवण्याची मागणी आम्ही निवडणूक आचारसंहिता लागण्याच्या आधीपासून केली आहे. मात्र, निर्णय घेतला जात नाही. रश्मी शुक्ला या आमच्या कार्यकर्त्यांवर आणि पदाधिकाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

आचारसंहिता लागण्याच्या आदल्या रात्रीपर्यंत भाजपा, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या उमेदवारांकडे पंधरा ते वीस कोटी रुपये पोहोचवले आणि हे सर्व पोलीस बंदोबस्तात झाले. राज्यात हेलिकॉप्टरने पैसे जातात. त्यांना कोण अडवणार? जे काही दोन पाच कोटी रुपये पकडले जात आहेत

# काँग्रेसच्या बेसमेंटमध्येच बॉम्ब
## क्षीरसागर यांची बोचरी टीका

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** उत्तर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसने उमेदवारी नाकारल्यानंतर आमदार जयश्री जाधव यांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यावरून शिंदे गटाचे कोल्हापूरमधील नेते, माजी आमदार राजेश क्षीरसागर यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. जयश्री जाधव यांच्यासारखे अनेक बॉम्ब काँग्रेसच्या बेसमेंटमध्ये आहेत. ते हळूहळू फुटतील, असे क्षीरसागर म्हणाले. जयश्री जाधव यांनी पक्ष सोडला त्याला काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील जबाबदार आहेत. त्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून जयश्री जाधव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. आपले तेच खरे असा हट्टीपणा खपवून घेणार नाही, हेच जयश्री जाधव यांनी दाखवून दिले आहे, असा टोलाही क्षीरसागर यांनी लगावला.

# धर्माच्या आधारे मते मागितली
## आझमींविरुद्ध सोमय्यांची तक्रार

■ मुंबई

**जाहीर** सभेतून अबू आझमी यांनी धर्माच्या आधारे मतदान करण्याचे आवाहन केले,अशी तक्रार भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे. धुळे जिल्ह्यातील मालेगाव येथे आयोजित समाजवादी पार्टीच्या (सपा) प्रचार सभेत आझमी म्हणाले की, आम्ही फक्त दोन आमदार आहोत. ही संख्या आपल्याला आठपर्यंत वाढवावी लागेल. ज्या दिवशी आपले आठ आमदार असतील तेव्हा कोणी माय का लाल मुस्लिमांवर अन्याय करण्याची हिंमत करणार नाही. मी माझ्या समाजासाठी माझ्या प्राणांचे बलिदान देण्यास तयार आहे. सोमय्या यांनी आझमी यांच्या या वक्तव्यावर आक्षेप घेतला आहे. आझमी यांनी धर्माच्या



आधारे मते मागून आचारसंहितेचा भंग केला आहे, असे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमय्या यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली असून राज्य निवडणूक आयोगाला यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# पर्वतीमध्ये सांगली पॅटर्न
## बॅनरबाजीमुळे चर्चेला ऊत

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील पर्वती विधानसभा मतदारसंघात सध्या सांगली पॅटर्नच्या बॅनरमुळे




चर्चेला ऊत आला आहे. पर्वतीमधून महाविकास आघाडीतून अश्विनी कदम यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे नाराज झालेले काँग्रेसचे नेते आबा बागूल यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे बागूल यांच्या समर्थकांनी हे बॅनर लावले असावेत, असा कयास लावला जात आहे. लोकसभा निवडणुकीत सांगली मतदारसंघात महाविकास आघाडीतून उमेदवारी न मिळाल्याने काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी बंडखोरी करीत अपक्ष लढून विजय मिळवला. विजयी झाल्यानंतर ते पुन्हा मविआमध्ये दाखल झाले. या सांगली पॅटर्नची आता विधानसभा निवडणुकीतही बरीच चर्चा होत आहे.

# जो रामभक्त असेल तोच राष्ट्रभक्त
## आदित्यनाथांचा अयोध्येत हल्लाबोल

■ अयोध्या

**जो रामभक्त** आहे तोच खरा राष्ट्रभक्त होऊ शकतो. देशातील लोकांमध्ये फूट पाडणाऱ्या लोकांना जर पुन्हा संधी दिली तर हे लोक पुन्हा गुंडगिरी करतील, महिला असुरक्षित होतील, असा जोरदार हल्लाबोल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल अयोध्येत केला. ते अयोध्येतील दिवाळी महोत्सवात बोलत होते. यावेळी योगी आदित्यनाथांनी विरोधकांवर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले की, रामराज्यात सर्व स्तरातील लोकांना कोणताही भेदभाव न करता सर्व योजनांचा लाभ मिळायला हवा. प्रांत,



भाषा, जातीच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जात नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकार अशाच प्रकारचे काम करत आहे. यंदाचे वर्ष फार महत्त्वाचे आहे. गेल्या ५०० वर्षांची प्रतीक्षा संपली आहे. रामलल्ला आपल्या मंदिरात विराजमान झालेले आहेत. आज जातीपातीच्या व प्रांताच्या आधारे कोणताही भेदभाव होत नाही. नागरिकांमध्ये फूट पाडणाऱ्यांमध्ये रावण व दुर्योधनाची गुणसूत्रे आहेत. या लोकांना परत संधी देता कामा नये. उत्तर प्रदेश लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाला मिळालेल्या यशामुळे योगी यांनी अयोध्येत हे वक्तव्य केल्याचे म्हटले जात आहे.

# प्रियांका चतुर्वेदींच्या पोस्टने वेधले
## संपत्तीकडे लक्ष! सत्ताधाऱ्यांची भरभराट

■ मुंबई

**राज्यातील** सत्ताधारी आमदारांच्या मालमत्तेमध्ये झालेल्या वाढीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी आपल्या एक्स पोस्टद्वारे लक्ष वेधले आहे. त्यांनी यावर कोणतीही टिप्पणी न देता केवळ आकडेवारीमधून ही भरमसाठ वाढ दाखवली आहे. प्रियांका चतुर्वेदी यांच्या या एक्स पोस्टमध्ये २०१९ ते २०२४ या काळात महायुतीच्या ६ उमेदवारांच्या संपत्तीमधील वाढ दाखवण्यात आली आहे. यात गीता जैन यांची २०१९ च्या निवडणुकीत ७०.४४ कोटींची मालमत्ता वाढून ती २०२४ मध्ये ३९२.३० कोटी रुपये झाली. राज्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार पराग शाह यांची मालमत्ता ५००.६२ कोटींवरून यंदा ३३८३ कोटी रुपये झाली, राहुल नार्वेकर यांची संपत्ती ३८ कोटींवरून यंदा १२९ कोटी रुपये, प्रताप सरनाईक यांची संपत्ती १४३ कोटींहून यंदा ३३३ कोटींवर गेल्याचे म्हटले आहे. तानाजी सावंत व दीपक केसरकर यांच्या संपत्तीत सर्वात कमी वाढ झाली आहे.

# झोपडीधारकांची फसवणूक
## मुरजी पटेलांविरुध्द याचिका

■ मुंबई

**निवडणुकीच्या** तोंडावर भाजपामधून शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून अंधेरी येथून उमेदवारी मिळविल्यानंतर मुरजी कानजी पटेल यांच्याविरूध्द १९९५ सालच्या फसवणुकीप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. अंधेरी, मरोळ येथील चार झोपडीधारकांनी ही याचिका दाखल केली आहे. पटेल यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना द्यावेत अशी मागणी केली आहे. अंधेरी पूर्व येथील मरोळ परिसरातील भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने (एमआयडीसी) झोपडपट्टी म्हणून घोषित केली आहे. १९९५ साली या ठिकाणी आकृती हबटाऊन ही बांधकाम कंपनी आणि मध्यस्थ मुरजी पटेल यांनी झोपडपट्टी पुनर्विकास योजना आणली. झोपड्यांच्या बदल्यात पक्की घरे देण्याचे आश्वासन या योजनेअंतर्गत झोपडीधारकांना देण्यात आले होते.

# उबाठाचा हिंदू सणांना विरोध! मनसेची अजब तक्रार

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेच्या दीपावली महोत्सवावर उबाठाने आचारसंहिता भंगाची तक्रार केली. मनसेकडून या तक्रारीला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे. उबाठाचा हिंदू सणांना विरोध असून, या जागी जर ईदची लायटिंग असती तर त्यांनी विरोध केला असता का? असा प्रश्न मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी उपस्थित केला आहे.

आदर्श आचारसंहिता काळात धार्मिक कार्यक्रम आयोजित करता येत नाही. जे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात त्यांनाही उमेदवार उपस्थिती लावत नाहीत. मनसेच्या दीपावली महोत्सवाला माहीमचे मनसे उमेदवार अमित ठाकरे उपस्थित होते. त्यामुळे



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार दाखल केली व या आयोजनाचा खर्च मनसेच्या निवडणूक खर्चात घ्यावा, अशी मागणी केली. यावर मनसेचे वरळी मतदारसंघातील उमेदवार संदीप देशपांडे यांनी अजब तर्क लावत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, आम्ही हिरवे कंदील लावले असते तर तुम्ही विरोध केला असता का? उबाठाचा हिंदू सणांनाच विरोध का? तुम्ही वांद्र्याला जाऊन विरोध केला असता का? आमचे सर्व हिंदू बांधव आपल्या सणाचा आनंद घेत असताना तुम्ही त्यांच्या आनंदावर विरजण का घालता?

दीपोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी पार्कवर मनसेचे निवडणूक चिन्ह असलेले ३०० ते ४०० कंदील लावले असून, काही बॅनरही लावले आहेत.

# अस्लम शेख यांच्या शैक्षणिक पात्रतेचा घोळ! भाजपाचा आरोप

■ मुंबई

**मालाड** पश्चिम विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार अस्लम शेख यांच्या उमेदवारी अर्जावर भाजपा उमेदवार विनोद शेलार यांनी आक्षेप घेतला आहे. शेख यांनी उमेदवारी अर्जातून आपल्या शिक्षणाबद्दल खोटी माहिती दिली, असा आरोप शेलार यांनी केला आहे.



शेख यांनी पहिल्यांदा निवडणूक लढवताना आपले शिक्षण बारावी उत्तीर्ण असे दाखवले, त्यानंतरच्या निवडणुकीत त्यांनी शैक्षणिक पात्रता नववी उत्तीर्ण असल्याचे सांगितले. आता २०२४ ची निवडणूक लढवताना त्यांनी शैक्षणिक पात्रता आठवी उत्तीर्ण असे नमूद केले आहे. म्हणजे शेख यांनी शासनाची आणि मतदारांचीही फसवणूक केली आहे, असे शेलार म्हणाले. शैक्षणिक पात्रतेचा घोळ असूनही शेख यांचा उमेदवारी अर्ज बाद ठरविण्यात आला नाही.



# चंद्रावर उतरलेले अंतराळवीर आल्ट्रीन यांचा ट्रम्पना पाठिंबा

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** अपोलो-२ या मोहिमेचे अंतराळवीर आणि चंद्रावर उतरलेले ब्रिगेडिअर जनरल बझ आल्ट्रीन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा जाहीर केला आहे. एक्सवर पोस्ट करून त्यांनी पाठिंबा जाहीर करत ट्रम्प यांचे कौतुकही केले आहे.

एक्स वरील संदेशात बझ यांनी म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प यांनी आपले आयुष्य वैज्ञानिक प्रगती व अंतराळ मोहिमांना प्रोत्साहन देण्यासाठी वेचले. अमेरिकेच्या अंतराळ धोरणामध्ये व राष्ट्रीय सुरक्षेमधील ट्रम्प यांचे निर्णय महत्त्वाचे होते. त्यांच्या पहिल्या कार्यकाळात अंतराळातील मानवी मोहिमांना गती मिळाली होती. राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या कामातही त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. सध्या जागतिक पातळीवर संरक्षणाचे अनेक प्रश्न आहेत. आपल्याला स्थानिक शांतता व आर्थिक स्थिरता हवी असून, त्यासाठी आपल्या देशाला असा नेता हवा आहे ज्याने या क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे. राष्ट्राध्यक्ष पदाच्या उमेदवाराला मानवी स्वभाव समजून घेण्याची क्षमता असली पाहिजे व योग्य ते निर्णय घेता आले पाहिजेत. कितीही दडपण आले तरी ज्या शांतपणे ते निर्णय घेतात त्यातून त्यांची वैचारिक प्रगल्भता दिसून येते.

# कुलाब्यात १० लाख डॉलर जप्त
## निवडणूक आयोगाची मोठी कारवाई

■ मुंबई

**निवडणुकीच्या** पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तपासणीत दक्षिण मुंबईतील कुलाबा मतदारसंघात कैवल्यधाम परिसरात निवडणूक आयोगाच्या पथकाने विविध देशांची सुमारे १० लाख डॉलरची रोकड वाहून नेणारे वाहन पकडले. या डॉलरची भारतीय चलनानुसार नऊ कोटी रुपये किंमत आहे. प्राथमिक तपासात ते पैसे बँकेचे असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. पुढील तपासासाठी रोकड कस्टम विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. बुधवारी सायंकाळी सहा ते सव्वा सहाच्या सुमारास कैवल्यधाम परिसरातून लॉजिस्टिक कंपनीच्या वाहनाला अडवून केलेल्या तपासणीत पथकाला डॉलर आढळले. ही रोकड विमानतळावरून बँकेकडे नेण्यात येत होती.

# सुरतच्या हिरे कारागिरांची दिवाळी मंदीत
## कंपन्यांकडून किरकोळ बोनस! साध्या भेटवस्तू

■ सुरत

**काही** वर्षांपूर्वी सुरतच्या हिरे उद्योगातील दिवाळी हा जगभरात चर्चेचा विषय ठरायचा. कंपन्या कामगारांना दिवाळी बोनस म्हणून नव्या कोऱ्या कार, फ्लॅट आणि अन्य महागड्या भेटवस्तू द्यायच्या. पण हिरे उद्योग डबघाईला आल्याने दिवाळी बोनसची चमकही ओसरली आहे. कंपन्यांनी यंदा कामगारांची किरकोळ रोख बोनस आणि साध्या भेटवस्तू देऊन बोळवण केली.

रशिया-युक्रेनमधील लांबलेले युध्द, मध्य पूर्वेतील देशांमध्ये वाढते संघर्ष, अमेरिकेसारख्या

**युद्धामुळे हिरे उद्योग संकटात**

बड्या देशांमध्ये आलेली मंदी, कृत्रिमरित्या बनविलेले हिरे याचा एकत्रित फटका सुरतच्या हिरे उद्योगाला बसला आहे. परिणामी येथील हिरे उद्योग सर्वात वाईट काळातून सध्या वाटचाल करीत आहे. सुरतच्या हिरे उद्योगावर याआधीदेखील संकटे आली. पण त्यातून येथील उद्योजक चिकाटीमुळे तरून गेले. पण सध्या जशी वाईट आर्थिक स्थिती आहे तशी स्थिती येथील उद्योजकांनी याआधी कधी अनुभवलेली नाही. मंदीचा हा काळ कधी संपेल आणि पुन्हा हिरे उद्योगाला सुगीचे दिवस येतील याची येथील उद्योजक आणि कामगार आतुरतेने वाट पाहत आहेत.

# समरजित घाटगे आणि जरांगेंची भेट
## हसन मुश्रीफ यांच्यावर टीका

■ जालना

**कोल्हापूरच्या** कागल विधानसभा मतदारसंघात समरजित घाटगे विरुद्ध हसन मुश्रीफ अशी चुरस आहे. समरजित घाटगे यांनी आज मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार हसन मुश्रीफ यांच्यावर टीका केली. घाटगे म्हणाले, मी मनोज जरांगे-पाटील यांच्या भेटीची वेळ मागितली होती. त्यांनी त्यांच्या व्यस्त कार्यक्रमांतून मला वेळ दिली. मी कागल विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून उभा आहे. त्यामुळे मी त्यांच्याकडे सहकार्य मागितले. त्यावर जरांगे म्हणाले की, शाहू महाराजांचे घराणे आहे. त्यांचा मान राखलाच पाहिजे. त्यावर मी त्यांना केवळ लक्ष ठेवण्याची विनंती केली. त्यांच्याशी सकारात्मक चर्चा



झाली. येत्या ३ नोव्हेंबरला त्यांची मिटिंग आहे. त्यावेळी जरांगे-पाटील निर्णय सांगणार आहेत. घाटगे यांनी यावेळी अजित पवार गटाचे उमेदवार हसन मुश्रीफ यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, मला विरोधकांनी मागील ५ वर्षांत भिकारी, हरामखोर, उंदीर म्हणून हिणवले. पण आता जनताच माझ्या बाजूने उभी आहे.

# आर्थिक कुवत पाहूनच आश्वासने द्या
## काँग्रेस नेत्यांना पक्षाध्यक्षांचा सल्ला

■ बंगळूरू

**निवडणुकीपूर्वी** सर्वच पक्ष आपल्या जाहीरनाम्यात मतदारांना भरमसाट आश्वासने देतात. परंतु सर्वच आश्वासने पूर्ण करता येत नाहीत. कर्नाटकमध्ये असेच घडले होते. त्यामुळे काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्रात राज्याच्या कुवतीप्रमाणेच निवडणुकीत आश्वासने द्या, असा सल्ला राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना दिला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा काँग्रेसचा जाहीरनामा पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पुढील आठवड्यात प्रसिध्द केला जाण्याची शक्यता आहे. यापूर्वी झालेल्या काही राज्यांच्या निवडणुकीवेळी काँग्रेसने विविध आश्वासने दिली होती. तशीच गॅरंटी यावेळी महाराष्ट्रातही पाहायला मिळणार का, याबाबत शंका निर्माण झाली आहे.

# मनसेचा महायुतीला पाठिंबा
## नाशिकचे उमेदवार माघार घेणार?

■ नाशिक

**मनसेकडून** नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात जिल्हाध्यक्ष अंकुश पवार आणि नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघात शहर उपाध्यक्ष प्रसाद सानप यांना उमेदवारी जाहीर केली. मात्र महायुतीला अडचणीच्या ठरणाऱ्या जागांवर मनसे उमेदवार माघार घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला पाठिंबा देणाऱ्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी अनेक उमेदवार घोषित केले. नाशिक मध्य, पूर्व, पश्चिम, इगतपुरीसह, देवळालीत मनसेकडून उमेदवार जाहीर करण्यात आले. यामुळे मनसे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आला. मात्र, राज ठाकरे आता महायुतीसाठी माघार घेणार असल्याचे सांगण्यात येते. मनसेकडून नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघात जिल्हाध्यक्ष अंकुश पवार यांना तिकीट देण्यात आले असून, त्यांनी उमेदवारी अर्जदेखील दाखल केला आहे. अंकुश पवार यांच्याकडून प्रचाराची तयारी सुरू करण्यात आली. या ठिकाणी भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे विरुद्ध ठाकरे गटाचे वसंत गिते यांच्यात लढत होत आहे.